**क्रमांक :- १३२.**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर, २०२६ / भाद्रपद १९, शके १९४७**

**१३२. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२६ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण २३० स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १० जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३० निवेदनांपैकी १५४ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ७६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता १४ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ६२ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : १० सप्टेंबर, २०२६**

**मेघना तळेकर**
**सचिव-२,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य

२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) एम. के. सी. एल.
११) संगणक कक्ष (WEBSITE)
१२) अनुवाद कक्ष
१३) प्रतिवेदन कक्ष

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र. २७७२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, संग्राम जगताप, विधानसभा सदस्य,.यांनी महाराष्ट्र विधानसभा अधिनियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २७७२ पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना संविधानानुसार आरक्षण व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत असणे, काही व्यक्तींनी ख्रिश्चन धर्मात धर्मांतरण केल्यानंतरही अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वापरून शासकीय नोकरी, पदोन्नती, निवडणुका तसेच विविध योजनांचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी अनेक जिल्ह्यांतून निदर्शनास येत असणे, यामुळे मूळ घटकातील गरजू लाभार्थ्यांवर मोठा अन्याय होत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने 'सी. सेल्वाराणी विरुद्ध स्पेशल सेक्रेटरी (२०२४)' आणि 'चिंताडा आनंद विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२०२६)' या प्रकरणांमध्ये याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असणे, धर्मांतरणानंतरही आरक्षणाचा लाभ घेणे हे बेकायदेशीर असणे, या बाबीची दखल घेऊन शासनाने प्रचलित अधिनियम व नियमांत तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता, त्यामुळे अशा प्रकरणांची विशेष तपासणी मोहीम राबविणे, अपात्र लाभार्थ्यांवर नियमानुसार कारवाई करणे, चुकीच्या पद्धतीने मिळविलेले लाभ परत घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणे, तसेच भविष्यात अशा प्रकरणांना प्रतिबंध करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेल दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

*************************************************************************************

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

संविधान ( अनुसूचित जाती) आदेश, १९५० अन्वये अनुसूचित जातीमध्ये येणाऱ्या जाती अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. या आदेशानुसार हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्माचे पालन करणारा व्यक्ती हा अनुसूचित जातीचा सदस्य राहणार नाही, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार

(रोटा)एच ४३४(८००-७-२०२६)-१

हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्माचे पालन करणारा व्यक्ती अनुसूचित जातीचे आरक्षणविषयक कोणतेही फायदे घेऊ शकत नाही.

संविधान (अनुसूचित जमाती) आदेश, १९५० अन्वये अनुसूचित जमातीमध्ये येणाऱ्या जाती अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. या आदेशाच्या अनुसूचीच्या (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमाती किंवा आदिवासी समुदाय, किंवा जमाती किंवा आदिवासी समुदायांचे भाग किंवा त्यातील गट, ज्या राज्यांशी ते भाग संबंधित आहेत त्या राज्यांच्या संबंधात, त्या अनुसूचीच्या त्या भागांमध्ये त्यांच्याशी संबंधित निर्दिष्ट केलेल्या परिसरांमध्ये राहणाऱ्या त्यांच्या सदस्यांपुरते अनुसूचित जमाती मानले जातील.

राज्यातील मागासवर्ग व्यक्तींना जातींचे प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे विनियमन करण्याकरिता आदिवासी विकास विभागामार्फत " महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३)" अधिसूचित करण्यात आला असून, सदर अधिनियम संपूर्ण राज्यास लागू आहे. उक्त अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दि.१ सप्टेंबर, २०१२ अन्वये "महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२" मधील विहीत तरतूदींनुसार संबंधित व्यक्तींना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाते. सदर अधिनियम, २००० नुसार कलम १० (१) अन्वये जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त केलेले लाभ काढून घेणेबाबत तरतूद आहे. यामध्ये विद्यार्थ्याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करून त्याआधारे लाभ घेतला असल्यास (शिष्यवृत्ती, अनूदान, भत्ता व इतर वित्तीय लाभ यांच्या स्वरुपात) अश्या विद्यार्थ्यांकडून सदर वित्तिय लाभ जमिन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे वसूलपात्र आहे. तसेच त्याआधारे घेललेली पदवी रद्द होईल, सेवेत असेल तर तात्काळ सेवामुक्त केले जाण्यास पात्र ठरेल आणि अशा व्यक्तीचे घेतलेले किंवा प्राप्त केलेले इतर कोणतेही लाभ तात्काळ काढून घेण्यात

एच ४३४-१अ

येतील. निवडणूक लढवली असल्यास व निवडून आल्यास त्याची/तिची निवड भूतलक्षी प्रभावाने समाप्त झाली, असे मानण्यात येईल. तसेच, या अधिनियामाअंतर्गत कलम ११ (१) अन्वये जी व्यक्ती हेतूपुरस्पर खोटे जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करेल त्यास अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील अशी तरतूद केली आहे.

राज्य शासन अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील नागरिकांना भारतीय संविधानातील तरतुदी तसेच विद्यमान कायदे व नियमांनुसार आरक्षण व विविध शासकीय योजनांचा लाभ प्रदान करीत आहे.

लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, काही व्यक्तींनी धर्मांतरण केल्यानंतरही अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र किंवा जात वैधता प्रमाणपत्र वापरून शासकीय नोकरी, पदोन्नती, निवडणुका तसेच विविध योजनांचा लाभ घेतल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या असल्यास अशा तक्रारींची संबंधित प्रकरणनिहाय तपासणी करण्यात येऊन , आवश्यकतेनुसार संबंधित प्राधिकरणांकडून माहिती मागविण्यात येईल .

मा. सर्वोच्च न्यायालयाने "सी. सेल्वाराणी विरुद्ध स्पेशल सेक्रेटरी (२०२४)" तसेच "चिंताडा आनंद विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (२०२६)" या प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्देशांचा शासन गांभीर्याने विचार करीत आहे. धर्मांतरणानंतर आरक्षणाच्या लाभासंदर्भातील पात्रता, संबंधित कायदेशीर तरतुदी तसेच न्यायालयीन निर्णयांचा अभ्यास करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने धर्मांतरासंबंधीच्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालक तसेच शासनाच्या संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली विशेष समिती गठित केली होती. सदर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी गृह विभागामार्फत महाराष्ट्र विधानसभेत सादर करण्यात आले आहे .

एच ४३४-२

लक्षवेधी सूचनेत नमूद केल्याप्रमाणे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील काही व्यक्तींनी ख्रिश्चन धर्मात धर्मांतरण केल्यानंतरही अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र वापरून शासकीय नोकरी, पदोन्नती, निवडणुका तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबाबतची बाब सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सविस्तर तपासण्यात येईल. सदर तपासणीमध्ये तथ्य आढळून आल्यास, संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रचलित अधिनियमातील तरतुदी तसेच विद्यमान कायदे व नियमांनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, अशा प्रकरणांमध्ये जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात येत आहे. चुकीच्या पद्धतीने आरक्षण अथवा अन्य शासकीय लाभ प्राप्त झाल्याचे आढळल्यास, संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. भविष्यात अशा प्रकारच्या प्रकरणांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्याबाबतही शासन विचाराधीन आहे.

*******************************************************

एन्च ४३४-२अ

लक्षवेधी सूचना क्र. ९४

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुधीर मुनगंटीवार, मा.विधानसभा सदस्य यांनी म.वि.स.नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने विदर्भातील अकोला, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यांमध्ये दि.१३ मे २०२६ रोजी संशयित व्यक्तींवर छापेमारी व झाडाझडतीची कारवाई केल्याची बाब समोर येणे, सदर कारवाईचा संबंध कथित पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी व त्याच्याशी संबंधित सीमापार गुन्हेगारी नेटवर्कशी असल्याची गंभीर माहिती पुढे येणे, चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरीसह विविध ठिकाणी संशयितांची चौकशी करण्यात येणे, काही संशयित व्यक्तींचे सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार तसेच इतर माध्यमांतून संशयास्पद संपर्क असल्याबाबत चर्चा होणे, त्यामुळे विदर्भातील संवेदनशील जिल्ह्यांच्या अंतर्गत सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, सीमावर्ती व दुर्गम भागांचा वापर गुन्हेगारी नेटवर्ककडून होत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येणे, स्थानिक युवकांना अशा जाळ्यात ओढले जाण्याचा धोका वाढणे, सायबर माध्यमातून वाढत्या संपर्कामुळे गुप्तचर यंत्रणेसमोर नवे आव्हान निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पोलीस, दहशतवाद विरोधी पथक व गुप्तचर यंत्रणांमध्ये अधिक समन्वयाची आवश्यकता अधोरेखित होणे, या गंभीर बाबीची दखल घेऊन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करणे, दोषींवर कठोर कारवाई करणे, सायबर मॉनिटरिंग अधिक बळकट करणे, संवेदनशील जिल्ह्यांमध्ये गुप्तचर जाळे मजबूत करणे तसेच युवकांमध्ये जनजागृती मोहीम राबवून राज्याच्या अंतर्गत सुरक्षेसाठी ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक १३ मे, २०२६ रोजी, दहशवाद विरोधी पथकामार्फत पाकिस्तानस्थित गँगस्टर शाहजाद भट्टी याच्याशी सोशल मिडियाव्दारे संपर्कात आलेल्या महाराष्ट्रभरातील एकूण ५६ इसमांची चौकशी करण्यात आली आहे. त्यापैकी विदर्भातील चंद्रपुर व भंडारा जिल्हयातील प्रत्येकी १ इसमाची दहशतवाद विरोधी पथकामार्फत सखोल चौकशी करण्यात आली असून सोशल मीडीया, डिजिटल व्यवहार तसेच इतर माध्यमांतून संशयास्पद संपर्क यांचे अनुषंगाने त्यांचे मोबाईलची तपासणी केली असता संशयास्पद असे काही आढळून आलेले नसून सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

राज्यातील संवेदनशील जिल्ह्यांची अंतर्गत सुरक्षा, सायबर माध्यमातून वाढत्या संपर्कामुळे गुप्तचर यंत्रणेसमोर असलेली आव्हाने व दहशतवादी कारवाया रोखण्याकरीता दहशवाद विरोधी पथक व महाराष्ट्र सायबर विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

- प्राप्त माहितीच्या अनुषंगाने दहशतवाद विरोधी पथकाच्या सर्व युनिट यांना त्यांची गोपनीय सुत्रे कार्यान्वयीत करून कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरीता माहिती प्राप्त करण्याबाबत सुचित करण्यात येते.

(शेटा) एच ७७०(४२५-८-२०२६)-१

- दहशतवाद विरोधी पथकाद्वारे वेगवेगळ्या सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर निगराणी ठेवून कट्टरतावादाकडे झुकलेल्यांचा शोध घेण्यात येतो.
- दहशतवाद विरोधी पथकाचे डि-रॅडीकलायझेशनचे प्रयत्न सतत सुरू असून आतापावेतो अशा १५८ इसमांचे डि-रॅडीकलायझेशन करण्यात आले असून नागरिकांमध्ये दहशतवाद सदंर्भातील जनजागृती आणि 'डि-रॅडीकलायझेशन' संदर्भात एकूण ०८ नवीन फिल्मस् बनविण्याल आलेल्या आहेत. त्यापैकी ६ लघुचित्रफीती (Short Film) चित्रपटगृहात व सोशल मिडीयावर प्रसारीत करण्याकरीता सर्व पोलीस घटकांना वितरीत करण्यात आलेल्या आहेत.
- महत्वाच्या संवेदनशील स्थळांना अतिरेकी / दहशतवादी हल्ल्यापासून असलेला धोका विचारात घेता संभाव्य घटनांचा मुकाबला करण्याकामी "प्रमाणित कार्यपध्द्ती' (S.O.P.) तयार करण्यात आलेली असून ती आवश्यकतेनुसार कार्यान्वीत केली जाते.
- पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाचे दि.१२/०७/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यात दहशतवाद प्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याकामी सर्व पोलीस आयुक्तालय/जिल्हा पोलीस मुख्यालय स्तरावर 'दहशतवाद विरोधी शाखा (ATB)' आणि संवेदनशील पोलीस ठाणे स्तरावर 'दहशतवाद विरोधी कक्ष (ATC)' ची स्थापना करण्यात आली आहे.
- महाराष्ट्र सायबर विभागामार्फत राज्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत उपलब्ध अत्याधुनिक Social Media Monitoring Tools च्या माध्यमातून मीडिया तसेच इतर डिजिटल माध्यमांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येते. या माध्यमातून राष्ट्रविघातक, अतिरेकी विचारसरणीचा प्रसार, सायबर गुन्हे तसेच सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या डिजिटल कृतींचे विश्लेषण व निरीक्षण करण्यात येते.
- सदर निरीक्षणादरम्यान प्राप्त होणारी कृतीयोग्य (Actionable) माहिती कायदा अंमलबजावणी संस्थांना आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी सुरक्षित (Secure) संप्रेषण माध्यमांद्वारे नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येते. तसेच विविध कायदा अंमलबजावणी व गुप्तचर यंत्रणांमध्ये आवश्यक समन्वय व माहितीची देवाणघेवाण सातत्याने करण्यात येते.
- याशिवाय, राज्यातील नागरिकांना विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक करण्यासाठी महाराष्ट्र सायबर विभागामार्फत सोशल मीडिया, संकेतस्थळे, प्रसारमाध्यमे, जनजागृती अभियान, कार्यशाळा, शैक्षणिक संस्था तसेच इतर विविध माध्यमांतून नियमितपणे सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतो.

---XXX----

एच ४५०-१३अ

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२६चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुधीर मुनगंटीवार, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३५२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"सांगली जिल्ह्यातील संजयनगर परिसरात तेरा वर्षीय शाळकरी मुलाची घरासमोर गोळ्या झाडून निघृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना दि. १२ जून, २०२६ रोजी घडणे, हल्लेखोरांनी मुलाच्या वडिलांबाबत व आजोबांबाबत चौकशी करून त्यानंतर त्याच्यावर गोळीबार केल्याची माहिती समोर येणे, या घटनेपूर्वी संबंधित संशयितांकडून धमक्या देण्यात आल्याची तसेच सार्वजनिक ठिकाणी हवेत गोळीबार केल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंद झालेली असणे, तरीही गंभीरतेने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या नसल्याबाबत प्रश्न निर्माण होणे, या प्रकरणी पाच संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी आरोपी फरार होणे, घटनेमुळे परिसरात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जाणे, तसेच या हत्येमागील नेमके कारण, गुन्हेगारी टोळ्यांचा संभाव्य संबंध व कायदा-सुव्यवस्था यंत्रणेच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी होत असताना शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक १०.०६.२०२६ रोजी आरोपी नामे निलेश गडदे याने आरग रेल्वे स्टेशन धक्यावर मुकादम म्हणुन काम पाहणारे लक्ष्मण खरात यांना "तु रेल्वे स्टेशन वरिल काम सोडुन दे, नाहीतर १० लाख रुपये दे" अशी धमकी देवुन तेथील अहिल्यादेवी होळकर चौकात पिस्टलने हवेत फायरींग केली होती. सदरचा प्रकार लक्ष्मण खरात यांनी बाळु बंडगर यांस सांगितले व घटनेच्या दुसऱ्या दिवशी दि. ११.०६.२०२६ रोजी लक्ष्मण खरात, बाळु बंडगर व त्यांच्या मुलगा मारुती बंडगर यांनी जत पोलीस स्टेशन येथे आरोपी निलेश गडदे याच्याविरुध्द खंडणी व गोळीबार प्रकरणी तक्रार देवुन पोलीस स्टेशन जत येथे गु.र.नं. ३३९/२०२६, भा.न्या.सं. कलम ३०८(४), ३३३, ३५१(२), ३५२, ३(५) सह आर्म ॲक्ट ३, २५ अन्वये गुन्हा दाखल केला होता.

सदर प्रकरणाचा राग मनात धरुन आरोपी निलेश गडदे याने दिनांक ११.०६.२०२६ रोजी बाळु बंडगर व त्यांचा मुलगा मारुती बंडगर यांना धमकी देवुन त्यांच्या राहत्या घरात अनधिकृतपणे प्रवेश करुन मारुती बंडगर यांचा १४ वर्षीय अल्पवयीन मुलगा नामे वेदांत मारुती बंडगर याची पिस्टलने गोळी झाडुन हत्या केली आहे. सदर प्रकरणी संजयनगर, पोलीस ठाणे येथे दि. १२.०६.२०२६ रोजी गु.र.नं. २३५/२०२६, भा.न्या.सं. कलम १०३(१), १८९(४), ३३२(ए)(सी), ४९ सह आर्म ॲक्ट ३, २५, २७, सह म.पो.का कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरच्या गुन्ह्यात एकुण ९ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला असुन मुख्य आरोपी निलेश गडदे सह एकुण ५ आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. उर्वरित चार आरोपींचा शोध

स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेकडुन घेण्यात येत असुन त्यापैकी एक विधी संघर्ष बालक असुन एक आरोपी अन्य गुन्ह्यात सांगली कारागृहात बंदीस्त आहे. तसेच आरोपींविरुध्द वरील घटनेच्या अनुषंगाने उक्त प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असुन यातील आरोपींचे पुर्व अभिलेख पडताळून त्यांच्यावर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदांतर्गत (मोक्का) प्रस्ताव तयार करुन ठोस प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

**********

(२)

ग्नच ९३८-९३१

लक्षवेधी सूचना क्र. १६१०

गृह विभाग

प्र/३८८

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रोहित पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६१० पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात ई-सिगारेटच्या विक्री व वापरावर बंदी असतानाही युवकांमध्ये ई-सिगारेटच्या वापराचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत असणे, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांद्वारे होणारे अप्रत्यक्ष जाहिराती यामुळे युवक मोठ्या प्रमाणात या व्यसनाकडे आकर्षित होत असून ई-सिगारेटमध्ये असलेले निकोटीन हे अत्यंत व्यसनाधीन करणारे रसायन असून त्याचा मेंदूच्या विकासावर, श्वसनसंस्थेवर आणि हृदयविकारांच्या जोखमीवर गंभीर परिणाम होत असल्याचे विविध वैद्यकीय संशोधनांमधून स्पष्ट झाले असणे, केंद्र शासनाने ई-सिगारेटचे उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरातींवर बंदी घातली असतानाही राज्यातील अनेक छोट्या छोट्या शहरांमध्ये, महाविद्यालय परिसरात, पानटपऱ्यांवर तसेच ऑनलाइन माध्यमांद्वारे ई-सिगारेट आणि वेपिंग उपकरणांची विक्री सुरू असणे, युवकांमध्ये वाढत असलेल्या या व्यसनामुळे सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून भविष्यात आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता असणे, तरी, राज्यात ई-सिगारेटच्या बेकायदेशीर विक्री व वापरावर आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

केंद्र शासनाने इलेक्ट्रॉनिक सिगारेट (उत्पादन, विनिर्माण, आयात, निर्यात, परिवहन, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) प्रतिबंध अधिनियम, २०१९ हा अधिनियम पारित करून दिनांक १८.०९.२०१९ रोजीपासून ई-सिगारेटवर बंदी घातली आहे. सदर अधिनियमान्वये ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठवणुक व जाहिरातीवर बंदी घातलेली आहे. सदर अधिनियमातील प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे आहेत:

- कलम ४:- ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, व जाहिरातीवर बंदी घालण्यात आली आहे.
- कलम ५:- ई-सिगारेट साठवणुक करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.
- कलम ७:- उत्पादन, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, व जाहिराती केल्यास एक वर्षापर्यंतची कैद किंवा रुपये एक लक्ष पर्यंत इतका दंड किंवा दोन्ही; आणि दुसऱ्या व तद्नंतरच्या गुन्हयाकरीता तीन वर्षापर्यंतची कैद आणि रुपये पाच लक्ष पर्यंत दंड अश्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

- कलम ८:- ई-सिगारेटची साठवणूक केल्यास सहा महिनेपर्यंतची कैद किंवा रुपये पन्नास हजार पर्यंत इतका दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

तथापि, अवैधरित्या वापरल्या जाणाऱ्या ई-सिगारेटबाबत राज्यात सन २०२३ मध्ये १२१, सन २०२४ मध्ये ८२ गुन्हे, सन २०२५ मध्ये ११९ गुन्हे व सन २०२६ (मे अखेर) मध्ये ११२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत उपाययोजना म्हणून पोलीस दिदी, पोलीस अधिकारी तसेच व्यसनमुक्ती संस्था यांचेमार्फत शाळा व महाविद्यालयात प्रत्यक्ष भेटी देऊन विद्यार्थ्यांना ई-सिगारेट च्या व्यसनाचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यात येते. मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, आईज ॲण्ड इअर यांचेमार्फत ई-सिगारेटच्या विक्रीवर लक्ष ठेवण्यात येते.

तसेच, इलेक्ट्रॉनिक सिगारेट (उत्पादन, विनिर्माण, आयात, निर्यात, परिवहन, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) प्रतिबंध अधिनियम, २०१९ या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना वेळोवेळी सूचना देण्यात येतात.

---------------------------

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक : २७९६</u> <u>गृह विभाग</u>

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. साजिद पठाण, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २७९६ पुढीलप्रमाणे आहे :-

" राज्यात सध्य:स्थितीत गुटका व तंबाखूजन्य पदार्थावर विक्री बंदी असल्याचे माहे जुलै,२०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, असे असतानाही अमरावती जिल्हयात ब्राम्हणवाडा थडी पोलीसांनी छाप्याअंतर्गत ५ लाख ३२ हजार रुपयांचा उक्त पदार्थ जप्त केले असणे, यामध्ये १) सैयद जुनैद सैयद जब्बार, २) विक्की सचानन्द मंगलानी तसेच त्यांचा इतर एका साथीदार असलेल्या समव्यावसायिकाला अटक करणे, ३) मोहम्मद बिलाल मोहम्मद याकूब आशार्फी या अटक करण्या-या लोकांचा सर्व राज्यभर गुटका विक्रीचे काम असणे, राज्यभरात हे सर्व जन गुटके विक्रीचे काम असुन याअंतर्गत हॉट,पान बहार पान पराग,रजनीगंधा गुटका विक्री प्रामुख्याने असणे, राज्यात यांची कंपनी CNF असुन याकंपनीद्वारे ते प्रामुख्याने यांचा प्रॉपर्टी चे अवैध पध्द्तीने भूखंड विक्रीचे काम करीत असणे, यांचे हस्तक रु१०० के स्टांप पेपर वर प्लॉट विक्री करती असणे, अवैध बाबीची एसआईटी द्वारे चौकशी करणे आवश्यक असुन अमरावती येथे वाढत असलेली वाढती गुन्हेगारी प्रकरणे वाढत असुनही याबाबत संबंधित पोलीस प्रशासन या गुन्हेगार प्रवृत्तीच्या व्यक्तीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तसेच नागरिकांचे गुटखा व तंबाखूमुळे होणारे शारिरीक लक्षात असुनही दुर्लक्ष करीत असल्याने लोकांमध्ये निर्माण झालेली चिड व असुरक्षितेची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत यबाबत करावयाची आवश्यक कारवाई व प्रतिक्रिया "

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६, क्र.एफएसएसए/अधिसूचना/७७७-२०१३/७, दिनांक १८ जुलै, २०१३ अनुसार लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी यांची निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर पदार्थाचे उत्पादन, विक्री, वितरण, साठवणुक व वाहतूक यावर दि.१५.०७.२०२१ च्या अधिसूचनेद्वारे दि.२०.०७.२०२१ पासुन प्रतिबंध घालण्यात आला आहे.

राज्यात तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास कोटपा कायद्यांतर्गत बंदी असतानाही त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (जाहिरातीवरील प्रतिबंध आणि व्यापार,

वाणिज्य, उत्पादन, वितरण व पुरवठा विनियमन) कायदा २००३ मधील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यात येते.

दि.१६.०६.२०२६ रोजी पोलीस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी, अमरावती येथे भा.न्या.सं. कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) अन्वये अपराध क्र.२४३/२०२६ गुन्हा दाखल करण्यात आला असून यामध्ये एकूण रु.५,३२,४२०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात एकुण ५ आरोपी निष्पन्न झाले असून सदर आरोपी फरार आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्यांचा शोध घेणे सुरु आहे. तथापि, या गुन्ह्यातील आरोपी क्र. (१) मोहम्मद बिलाल मोहम्मद याकूब आशार्फी व इतर दोन जणांविरुध्द पोलीस स्टेशन नागपूरी गेट, अमरावती येथे अपराध क्र.३५६/२०२४ कलम ५९ अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ सह भा.न्या.सं. कलम २२३, २७४, २७५, १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून यामध्ये रु.१३,८६,१८८/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अमरावती येथील प्रतिबंधित गुटख्यासंबंधात करण्यात आलेल्या कारवाईत (१) सैयद जुनैद सैयद जब्बार व (२) विक्की सचानन्द मंगलानी यांचा सहभाग आढळून आला नाही. तसेच CNF कंपनीविरुध्द अमरावती येथे कोणताही गुन्हा दाखल नाही. एसआयटी द्वारे चौकशी करणे आवश्यक असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आली नाही, असे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि.१०.०७.२०२६ च्या अहवालात नमूद आहे.

लोकांना गुटख्याच्या व तंबाखुजन्य पदार्थांच्या व्यसनापासून परावृत्त करण्याबाबत पुढील उपाययोजना करण्यात येतात - (१) ३१ मे या जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोलीस दिदी, पोलीस अधिकारी शाळा व महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देतात. विद्यार्थ्यांशी संवाद साधून धूम्रपान, गुटख्याचे व्यसनापासून होणाऱ्या दुष्परिणामाबाबत समुपदेशनाद्वारे जनजागृती करण्यात येते. याअनुषंगाने काही तक्रार असल्यास हेल्पलाईन क्र. ११२१०९११०९८ यावर फोन करण्यास मुलांना कळविण्यात आले आहे. (२) गुटख्याची वाहतूक व विक्रीबाबतची माहिती काढून चेकपोस्टवर सक्त नाकाबंदी नेमून वाहनांची तपासणी व सापडल्यास कारवाई करण्यात येते. (३) अवैध धंद्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने महिन्यातून एकदा ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात येते. (४) रेडिओ, एफ एम द्वारे लोकांमध्ये तंबाखुजन्य पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती केली जाते. रहिवाशी सोसायट्या व स्थानिक पोलिस ठाणे यांच्या प्रबोधनात्मक बैठका घेतल्या जातात. (५) प्रतिबंधित गुटखा व तंबाखुजन्य पदार्थांचे उत्पादन, विक्री, साठा, वितरण, वाहतूक रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आणि पोलीस यांची संयुक्तपणे कारवाई करण्यात येते. (६) तसेच शाळा,कॉलेज परिसरात तंबाखुजन्य पदार्थ विक्रीस बंदी घालण्यात आली असून विक्री व पुरवठा करताना आढळ्यास त्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येते.

--------

**लक्षवेधी सूचना क्र.८०१**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**मा. श्री. किसन कथोरे,श्री. संजय केळकर श्री. कुमार आयलानी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.८०१ पुढीलप्रमाणे आहे -:**

"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ३५/३/२ क्षेत्र ५७.०० हे.आर.ही जमीन खाजगी जमीन मालक श्री रामकृष्ण शंकर जोशी व इतर यांची असणे, परंतु सदर जमिनीवर नगरपरिषदेने अतिक्रमण करून शाळेचे बांधकाम करण्यात येणे, याबाबत सन २००९ च्या डिसेंबरमध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २०९३ उपस्थित केलेला असणे, त्यावेळी नगरपालिकेच्या नावाने सातबारा करण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबत उत्तर देण्यात येणे,जमीन मालकाने जागा खाली करून देण्याबाबत नोटिसा बजावने २०१० पासून नगरपरिषदेने शाळेच्या आरक्षणाबाबत एमएमआरडीएकडे प्रस्ताव पाठवणे एमएमआरडीएने जमिनीबाबत २०१९ मध्ये शासनाच्या नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागवण्यात येणे, नगरपरिषदेने तहसीलदार यांच्याकडे जमीन धारकास कोणताही मोबदला न देता सातबारा उताऱ्यावर नगरपरिषदेच्या नावाची नोंद घेणे बाबत अर्ज करणे परंतु तहसीलदार यांनी नगरपरिषदेची मागणी फेटाळण्यात येणे, जागा मालकाने संमती दिली नाही तरीसुद्धा नगरपरिषदेने नवीन वर्ग खोल्या इमारत बांधकाम करण्यात येणे, टीडीआर किंवा मोबदला न दिल्याने जागा मालक बेचैन होऊन जागेचा ताबा मागत असणे, जागेचा प्रश्न प्रलंबित असल्याने शाळेतील हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर टांगती तलवार असणे, त्यामुळे शासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन करावयाची वा करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास)महोदयांचे निवेदन**

महाराष्ट्र शासन शालेय विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांनी दि.२३/०३/२००७ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे जा.क्र.ठाजिप/शिक्षण/प्राथमिक/प्रशा-१/५ शिक्षण विभाग (प्राथमिक) जि.प.ठाणे दि.०७/०१/२००८ अन्वये नगर परिषद हद्दीतील जिल्हा परिषद शाळा, त्यांच्या जमिनी, इमारती, अभिलेख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, साधन सामग्री व सर्व स्थावर जंगम मालमत्तेसह जिल्हा परिषद ठाणे यांनी कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस शाळेच्या इमारत व जमिन यांचा कोणताही मोबदला न घेता, आहे त्या स्थितीत कुळगांव बदलापूर नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करणेस **१९** प्राथमिक शाळेस मंजूरी दिली. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंबरनाथ यांचे पत्र क्र.जा.क्र./पसंअ/शिक्षण/वशि/आ-३/४४२ पंचायत समिती अंबरनाथ दि. १८/०६/२००८ अन्वये करारनामा करुन एकुण १९ प्राथमिक शाळा नगरपरिषदेच्या ताब्यात दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे उपरोक्त शाळा नगरपरिषदेकडे हस्तांतरीत झालेली आहे. याअगोदर

याठिकाणी जिल्हा परिषदेमार्फत ही शाळा चालविण्यात येत होती. याठिकाणी चालू असलेली शाळा स्वातंत्र्यपूर्व कालावधीपासून चालू असल्याचे समजते.

मंजूर विकास योजनेमध्ये मौजे कुळगांव, ता. अंबरनाथ येथील स.नं.३५, हि.नं.३ पैकी या भूखंडावर अस्तित्वातील प्राथमिक शाळा दर्शविलेली आहे. याबाबत मूळ मालक श्री. जोशी कुटुंबिय यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ उत्तारा असून, सदर शाळेची जागा ताब्यात मिळण्याबाबत श्री. जोशी कुटुंबियांकडून वारंवार पाठपुरावा सुरु असून, त्यांचे वकील श्री.शेख एम. इकबाल यांचे मार्फत दि.२६/११/२०११ रोजी जागा खाली करणेबाबत कुळगांव-बदलापूर नगपरीषदेस लेखी कळविण्यात आले होते.

नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दि.२०/०२/२०१०, ठराव क्र. १०९ अन्वये असा ठराव पारीत करण्यात आला की, सर्वच प्राथमिक शाळा जिल्हापरिषदेच्याही नावे नाहीत. त्यामुळे त्या जागा नगरपरिषदेच्या नावे होण्यामध्ये अडचणी आहेत. त्यासाठी यापूर्वी झालेल्या शाळांचे ७/१२ काही ठिकाणी अद्यापी जमीनमालकाचे नावे आहेत व आता ते जमिनमालक त्या जागांवर हक्क प्रस्थापित करीत असून, त्यांना टि.डी.आर. स्वरुपात मोबदला अपेक्षित आहे. परंतु, विकास योजनेमध्ये सदर जागा आरक्षणापैकीची नसल्याने या जागेच्या मोबदल्यात टि.डी.आर. देता येत नाही. त्या अनुषंगाने नगरपरीषदेने ठराव करुन संबंधित जमीनमालकांना टि.डी. आर. स्वरुपात मोबदला देणेकरीता विषयांकित मिळकतीवर शाळेचे आरक्षण प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण दर्शवून किरकोळ फेरबदल करणेबाबत, आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दि.०९/०६/२०१० अन्वये पत्र सादर करण्यात आले होते.

नगरपरिषदेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने एम.एम.आर.डी.ए., मुंबई यांनी दि.०७ सप्टेंबर २०१२ च्या पत्रान्वये "नगरपरिषदेने मंजूर केलेला दि.२०/०२/२०१० रोजीचा ठराव क्र.१०९/३ हा कायद्यास अनुसरुन केल्याचे आढळून येत नाही. तसेच मौजे कुळगांव, ता. अंबरनाथ येथील स.नं.३५, हि.नं.३ पैकी या जमिनीवर जिल्हा परिषदेची शाळा अस्तित्वात असल्याने तसेच सदर जमिन मंजूर विकास योजनेमध्ये अस्तित्वातील शाळा म्हणून दर्शविलेली असल्याने विषयांकित जमिन ही मंजूर विकास यांजनेच्या नकाशावर शाळेच्या आरक्षणामध्ये दर्शविणे संयुक्तीक होणार नाही. तथापि, सदर जमिनीवर अस्तित्वात असलेल्या शाळेचा पुनर्विकास करावयाचा असल्यास या अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र.४.२.२ नुसार विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदी लागू राहतील" असे नगरपालिकेस कळविलेले आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कुळगांव-बदलापूर नगरपरीषदेलने दि.०८/१०/२०१२ अन्वये, "श्री.रामकृष्ण जोशी हे सदर जागा खाली करून मिळणेबाबत अथवा टि.डी. आर. मिळणेबाबत अर्ज करीत असून त्यांचे वकीलांमार्फत नगरपरिषदेस नोटीस देण्यात आली असल्याने व नगरपरिषदेने अस्तित्वातील शाळेवर येथील मुलांचे शिक्षणाचे नुकसान म्हणून आरक्षण दर्शविण्याचा ठराव केला असून गरीब गरजू विद्यार्थी यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने विचार होऊन सदर जागेवर आरक्षण दर्शविणेबाबत विचार व्हावा" असे कळविण्यात आले होते.

वरील पत्राच्या अनुषंगाने एम.एम.आर.डी.ए., मुंबई यांनी त्यांचे दि.२३ नोव्हेंबर २०१२ पत्रान्वये विषयांकित जमिनीवर जिल्हा परिषदेची शाळा अस्तित्वात असल्याने तसेच सदर जमिन

मंजूर विकास योजनेमध्ये अस्तित्वातील शाळा म्हणून दर्शविलेली असल्याने विषयांकित जमिन ही मंजूर विकास योजनेच्या नकाशावर अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदल करून शाळेच्या आरक्षणामध्ये दर्शविणे संयुक्तीक होणार नाही असे कुळगांव-बदलापूर नगरपरीषदेस कळविलेले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने कुळगांव-बदलापूर नगरपरीषदेने दि.०७/१२/२०१२ अन्वये "सदरची जागा न्यायालयाच्या माध्यमातून खाली करून घेतल्यास नगरपरिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे अतोनात नुकसान होईल, तरी सदर गरीब व गरजू विद्यार्थी यांच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये याद्दष्टीने विशेष बाब म्हणून सदर जागेवर आरक्षण दर्शविणेबाबत विचार होण" करीता पुन्हा पत्र सादर करण्यात आले होते.

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने दि.१६/०६/२०२५ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा ठराव पारित करण्यात आला असून फेरवदलाचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडील दि.२८/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदरचा फेरबदलाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला असून जागा मालक यांना मोबदला देणेबाबत जिल्हा परिषद, ठाणे व कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यात यावा असे कळविले आहे.

तद्नंतर मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांनी "विषयांकीत जागेच्या ७/१२ उताऱ्यावर श्री. रामकृष्ण शंकर जोशी व इतर नऊ यांची मालकी असली तरी जिल्हा परिषद, ठाणे यांनी मौजे कुळगांव येथील स.नं.३५/३/२ या जागेचा यापूर्वी कोणत्याही स्वरुपात मोबदला देण्यात आला आहे अथवा जमीन मालकांशी जमिनीवाबत करारनामा केला आहे अगर कसे? याबबातची माहिती प्राप्त करण्यात यावी. तसेच जागेचा मोबदला जिल्हा परिपद, ठाणे यांचेमार्फत दिला नसल्यास जागेच्या मूल्यांकनाकरिताचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडे पाठविण्यात यावा." असे आदेश पारित केले आहेत.

तरी, विषयांकीत शाळेमध्ये शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भविष्यात गंभीर प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता कुळगांव बदलापूर नगरपरिषदेमार्फत सदर जागेच्या मूल्यांकनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडे पाठविण्यात आला असून प्रचलित नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

************

**लक्षवेधी सूचना क्र.१७२३**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**मा.श्री.गोपिचंद पडळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१७२३ पुढीलप्रमाणे आहे :-**

" उमरावसिंग ओस्तवाल (Shree Ostwal Builders Ltd.) यांनी २६/११/१९९६, १६/११/१९९६ व १५/०३/१९९५ रोजीच्या प्रारंभ परवान्यातील अट क्र. १, २, ४ व ५, तसेच मंजूर नकाशातील मर्यादा भंग करून G+७ मजली इमारत उभारणे, १८ मीटरच्या प्रस्तावित रस्त्याचा व पार्किंगची जागा झाकून सुमारे ६०,००० चौ. फुट जादा FSI वापरून अनधिकृत बांधकाम केले असणे, तत्कालीन आयुक्त दिलीप ढोले, तत्कालीन सहायक संचालक नगररचना दिलीप घेवारे, विधी अधिकारी सई वडके आणि कनिष्ठ अभियंता सचिन पवार यांच्या संगनमताने १९/०५/२०२१ रोजी सदर अनधिकृत इमारतीस O.C. देणे, तसेच संस्थेत राहणारे रहिवाशीनी त्वरित हरकत दाखल करून व कलम २६० अंतर्गत महापलिकेमार्फत तोडक कारवाई करून सुद्धा, कोणतीही वैधानिक सुनावणी न करता, विकासकाने सादर केलेली कागदपत्रे बनावट व दिशाभूल करणारी असल्याचे पुरावे असूनही, दि.१६/०९/२०२२ रोजी OC ला पुन्हा मान्यता देणे, सदर प्रकरणात विकासक यांनी मीरा-भाईंदर महपालिका हद्दीतील इतर प्रकल्पांतही मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केले असणे, विकासक व संबंधितांवर विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंदवलेले असणे, सदर बेकायदेशीर कृत्य व महापालिकेचे संबंधित अधिकारी यांचेमुळे सुमारे २२१ खरेदीदारांच्या मालमत्ताहक्कांचे नुकसान होणे, फसवणूकग्रस्त रहिवाशांसाठी विशेष पुनर्वसन कोष स्थापन करून तातडीची मदत व कायदेशीर संरक्षण करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन, नगर विकास विभागाने दि.१४ मे १९९७ रोजीचे अधिसूचनान्वये मंजूर करण्यात आलेली होती. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५ ऑगस्ट २००० रोजीचे अधिसूचनान्वये मंजूर झालेली होती.

सदस्थितीत, मंजुर विकास योजना सुधारित करण्याच्या अनुषंगाने वैधानिक कार्यवाही पुर्ण करून नियुक्त अधिकारी यांनी कलम ३० अन्वये दि.२५/१०/२०२३ रोजी मंजुरीसाठी शासनास सादर केली असता सदरची सुधारीत प्रारुप विकास योजना कलम ३१ (१) अन्वये दि. १६/०४/२०२६ रोजी सारभुत स्वरुपाचे (EP) फेरबदल वगळुन शासनामार्फत मंजूर करणेत आली आहे.

मौजे खारी, येथील (जुना) स.क्र.१५९ ते १६४ (नविन) स.क्र.२० ते २५ या एकत्रित जमिनीच्या रेखांकनास जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.१९/११/१९८७ अन्वये बिनशेती आदेश पारीत केले असून सदर एकत्रित रेखांकनामध्ये बांधकाम मंजुरीच्या अनुषंगाने सहायक संचालक, नगररचना ठाणे यांनी वेळोवेळी केलेल्या शिफारसीनुसार तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेने मंजूर रेखांकनामध्ये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. सदर परवानगीमध्ये सी-२ सेक्टर या भूखंडाचे सुधारीत बांधकाम परवानगी देण्याच्या अनुषंगाने तत्कालीन नगर रचनाकार, ठाणे शाखा कार्यालय, ठाणे यांच्याकडील दि. १६/११/१९९६ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत बांधकाम परवानगी देणेकामी नगर परिषदेत शिफारस केली असून सदर शिफारसीच्या अनुषंगाने भुखंड क्र.सी-२ यामध्ये इमारत विंग ऐ व बी करीता (तळ + ७) मजलेच्या मर्यादेत

एकूण बांधकाम क्षेत्र ११७१६.४८ चौ.मी. करीता दि.२६/११/१९९६ रोजी तत्कालीन नगरपरिषदेने परवानगी दिलेली होती.

उपरोक्त बांधकाम परवानगी देतांना त्यामध्ये अट क्र. १, २, ४ व ५ यासह इतर अटीशर्ती तत्कालीन नगरपरिषदेमार्फत नमुद करण्यात आल्या होत्या सदरच्या नमुद अटीनुसार बांधकाम परवानगी मंजुर नकाशाप्रमाणे करणे व दि.१५/०४/१९८५ च्या परवानगीमधील अटी व शर्तीचे पालन करणे तसेच जोता प्रमाणपत्र (प्लिंथ सर्टीफिकेट) न घेता बांधकाम केल्यास परवानगी रद्द करणे इत्यादी अटी नमुद करण्यात आल्या होत्या.

सदरच्या परवानगीमधील अटीच्या अनुषंगाने जोता प्रमाणपत्र (प्लिंथ सर्टीफिकेट) घेण्यात आल्याचे दिसुन येत नसल्याचे तसेच इतर अटीचा भंग करुन विना परवानगी अनेक इमारतीचे बांधकाम केले असल्याचे सदरच्या रेखांकनामध्ये सुधारणा करुन परवानगी देताना निदर्शनास आल्याचे दिसून आले नसल्याची बाब विचारात घेऊन वेळोवेळी सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आल्याचे मिरा- भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

सी-२ या भुखंडाचे विकासक मे. जनता हाऊसिंग प्रा.लि., व मे. ओस्तवाल बिल्डर्स प्रा.लि., यांचेमध्ये दि. २८/११/१९९६ रोजी झालेल्या विकास करारानुसार उपरोक्त नमुद सेक्टर सी-२ मधील विंग "ऐ" व विंग "बी" "ओस्तवाल ऑर्नेट" या जुन्या इमारतीचे ६६२००.०० चौ.फुट व विक्री केलेले ७४४२७.०० चौ. फुट असे एकुण १४०६२७.०० चौ. फुट म्हणजेच १३०६४.५६ चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्रासाठी विकसन करारनामा झाला होता सदरच्या विकसन करारनाम्याच्या अनुषंगाने सी-२ भुखंडामध्ये दि.२६/११/१९९६ अन्वये एकुण बांधकाम क्षेत्र ११७१६.५८ चौ. मी. साठी बांधकाम परवानगी दिलेली असतांना प्रत्यक्ष जागेवर १३०४५.७५ चौ.मी. क्षेत्राचे बांधकाम झाल्याचे महानगरपालिकेच्या निर्देशनास आले असता महानगरपालिकेमार्फत संबंधितांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६० अन्वये नोटीसा देऊन सदर इमारतीमधील वाढीव / अनधिकृत बांधकामावर दि.२७/०४/२०२१ रोजी अंशतः तोडक कारवाई महानगरपालिकेकडून करण्यात आली होती. तसेच वाढीव बांधकाम केले प्रकरणी विकासक मे. ओस्तवाल बिल्डर्स प्रा.लि., यांचे विरुदध नवघर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणी महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या तोडक कार्यवाहीच्या अनुषंगाने सदरील इमारतीमधील सदनिका धारक यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केल्या असता, मा. उच्च न्यायालयाने दि.०७/०५/२०२१ रोजी आदेश पारीत करुन त्यामध्ये विकासकाने महानगरपालिकेकडे सादर केलेल्या बांधकाम नियमितीकरणाच्या प्रस्तावावर महानगरपालिकेने दि.३१/०७/२०२१ पर्यंत निर्णय घ्यावा व निर्णय घेईपर्यंत सदरील इमारतीच्या बांधकामावरती कोणतीही बलपुर्वक (coercive) कारवाई करु नये, असे आदेश पारीत केले होते. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेश विचारात घेऊन विकासक यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर महानगरपालिकेने जागेवरील परिस्थितीनुसारचे(As Built) नकाशानूसार विना जोता व भोगवटा प्रमाणपत्राशिवाय इमारत वापर सुरु असल्याचे कारणाने दंडणीय शुल्कासह इतर शुल्काचा भरणा करून घेऊन, सेक्टर सी-२ या भुखंडावरील "ओस्तवाल ऑर्नेट" इमारत विंग "ऐ" व विंग "बी" या इमारतीस दि.१९/०५/२०२१ अन्वये UDCPR मधील तरतुदीनुसार एकत्रित रेखांकनाच्या भुखंडाचे क्षेत्र (१५८४४३.९८ चौ. मी) विचारात घेऊन सदर एकत्रित रेखांकनाच्या भुखंडावर अनुज्ञेय होणारा चटई क्षेत्र

निर्देशांक विचारात घेऊन As built नकाशानुसार भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे. सदरचे भोगवटा प्रमाणपत्र देताना प्रकल्पाचे संरचनात्मक अभियंता यांचेकडील तसेच प्लंबिंग कॉन्ट्रक्टर यांचे दाखले तसेच अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखले सादर केले नव्हते. तथापि, यानंतर संबंधित सल्लागार अभियंता यांनी महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडील दि.२५/११/२०२१ रोजीचे ना-हरकत दाखला सादर केला आहे.

विषयांकित 'ओस्तवाल ऑर्नेट' इमारत ही अंशतः १८.०० मी. विकास योजना रस्त्याने बाधीत होत असुन इमारतीचा २० वर्षापासुनचा वापर, इमारतीमधील राहणारी कुटुंबे इत्यादी बाबींचा विचार करता संपुर्ण इमारत अनधिकृत घोषित करणे संयुक्तीक नसल्याने जागेवर मंजुरीव्यतिरिक्त वाढीव झालेल्या १३२९.१६ चौ.मी. बांधकाम क्षेत्राकरिता DRC क्र.५९९/२०२० मधील १३३०.०० चौ.मी. क्षेत्राच्या विकास हक्क प्रमाणपत्राचा (TDR) वापर करून आयुक्त,मिरा-भाईंदर, महानगरपालिका यांचे प्राप्त अधिकारात महानगरपालिकेने वाढीव बांधकामाबाबत दंडणीय शुल्क आकारून विषयांकित इमारतीच्या बांधकामास As Built नकाशे मंजुरीसह भोगवटा दाखला दि.१९/०५/२०२१ रोजी देण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणात "ओस्तवाल ऑर्नेट" या इमारतीस दि. १९/०५/२०२१ रोजी देण्यात आलेल्या As built भोगवटा दाखल्याबाबत तक्रारधारक श्री. शिजॉय मॅथ्यु यांची मिरा भाईंदर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त, प्र. सहायक संचालक नगररचना, कनिष्ठ अभियंता, विधी अधिकारी तसेच प्रस्तावाचे विकासक मे. ओस्तवाल बिल्डर्स व त्याचे सल्लागार अभियंता मे. तेजस कन्सल्टंट यांचे विरुद्ध संगनमताने चुकीचा भोगवटा दाखला देणे व भ्रष्टाचार करणे याबाबत जिल्हा न्यायालय, ठाणे येथे फौजदारी संकिर्ण अपिल क्र. ७७०/२०२२ दाखल केली असता सदर अपिल मा. न्यायालयाने दि. २१/०३/२०२३ रोजी फेटाळून लावले आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे As built नुसार भोगवटा दाखला सदर इमारतीस दिला असुन, सदर भोगवटा दाखला देताना सदरच्या इमारतीमधील सदनिकाधारक यांनी महानगरपालिकेच्या तोडक कार्यवाही करण्याच्या विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली याचिका व त्यानुसार मा. न्यायालयाचे आदेशानुसार तसेच इमारतीमधील सदिनका धारक व गाळेधारक यांचे साहनुभुतीपुर्वक विचार करून सदर प्रकरणी जर इमारतीस नियमाकुल करणेस भोगवटा दाखला दिलेला असून जर त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला नसता तर सदिनकाधारकांचे आर्थिक नुकसान झाले असते त्यामुळे सदर प्रकरणी इमारतीत नियमाप्रमाणे भोगवटा दाखला दिला असल्याने यामध्ये सदनिकाधारकांच्या मालमत्ता हक्काचे तसेच आर्थिक हिताचे कोणतेही नुकसान झाल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणी तत्कालीन नगरपरिषदेने दि. २६/११/१९९६ अन्वये दिलेल्या बांधकाम परवानगी नुसार वाढीव झालेले बांधकाम हे दि.१९/०५/२०२१ अन्वये महानगरपालिकेने नियमाकुल करणेसह त्यास भोगवटा दाखला हा नियमावलीमधील तरतुदीचा अवलंब करुन दिला असल्याची बाब विचारात घेता दि.१९/०५/२०२१ अन्वयेचा भोगवटा दाखला व तदनंतर मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तत्कालीन आयुक्त यांनी दि. १६/०९/२०२२ अन्वये पारीत केलेले आदेश रद्द करुन इमारत अनधिकृत घोषित करण्याची बाब ही संयुक्तिक नाही.

***********

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.जयंत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२५४४ पुढीलप्रमाणे आहे :-**

" मीरा भाईंदर मनपा क्षेत्रातील पेणकरपाडा येथील 'आरएनए (ए.ए.) कोर्ट यार्ड' आणि मौजे नवघर येथील 'युनिक हाईट' (इमारत ई-१०, ई-११) या प्रकल्पांमध्ये तळमजल्याचा बेकायदेशीरपणे वाणिज्य वापर करून FSI चे उघड उल्लंघन केल्याचे निदर्शनास येणे, या प्रकल्पांमधील अनधिकृत दुकाने व सदनिका विकण्यासाठी विकासकांनी मीरा भाईंदर मनपाचे खोटे, बोगस व बनावट नकाशे व दाखले तयार करून शेकडो लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास येणे,मनपा नगररचना विभागाने पत्र दि. १७/०६/२०१९ अन्वये 'मे. रवी डेव्हलपर्स' यांची सुधारित बांधकाम परवानगी रद्द केली असतानाही, विकासकाने बनावट दस्तऐवज तयार करून ५० पेक्षा अधिक इमारतींमध्ये अनधिकृत फ्लॅट, दुकाने व बंगल्यांची विक्री केल्याचे निदर्शनास येणे, या अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाई करण्याचे उच्च-सर्वोच्च न्यायालयाने तसेच नगर विकास विभागाचे आदेश असतानाही मनपा बिल्डरांना पाठीशी घालून कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास येणे,या बनावट नकाशे,कागदपत्रे तयार करणाऱ्या विकासकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आणि अनधिकृत बांधकामांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची होत असलेली मागणी, त्यावर शासनाची प्रतिक्रीया, व केलेली कार्यवाही."

### मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

**अ)** मिरा भाईंदर महानगरपालिका येथील 'आरएनए (ए.ए.) कोर्टयार्ड इमारतीकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मौजे पेणकरपाडा, स.क्र. २१२पै., व इतर एकूण क्षेत्र १८००६.०० चौ.मी. विकासक मे.आर.एन.ए.बिल्डर्स यांना महानगरपालिकेने दि.०१/०१/२००४ रोजी विकास परवानगी दिलेली आहे. तदनंतर सदर प्रकरणी महानगरपालिकेने दिनांक २३/०८/२००५ रोजी एकूण ४ इमारती, तळ + ८ मजले करीता सुधारीत बांधकाम परवानगी दिली असून त्यातील इमारत क्र.१ तळ मजल्यावर अंशत: वाणिज्य व उर्वरीत इमारत ही रहिवास वापराकरीता व इतर सर्व इमारती रहिवास वापराकरीता परवानगी दिलेली आहे. तदनंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि.१३/०९/२००७ अन्वये उक्त सर्व इमारतींना As built भोगवटा दाखला दिला आहे. त्यात केवळ इमारत क्र.१ मध्ये तळ मजल्यावर ८ शॉप होते.

उपरोक्त नमुद प्रमाणे भोगवटा दाखला दिला असताना महानगरपालिकेकडे सदर इमारत क्र. १ व २ मधील तळ मजला येथे विना परवानगी रहिवास वापरा व्यतिरिक्त वाणिज्य वापर सुरु असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली असता सदर अनधिकृत वापराचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागास कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले होते.

तदनंतर इमारत क्र.१ व २ मधील तळ मजल्यावरील रहिवासी सदनिकेचा शॉपसाठी वापर बदल प्रस्ताव मंजूरीसाठी वास्तुविशारद यांचेमार्फत दि.०३/०१/२०२० रोजी महानगरपालिकेकडे सादर केला असता महानगरपालिकेने दि.०४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

सद्यस्थितीत इमारत क्र. ०१ मधील मंजूर ८ शॉप ऐवजी ३३ (अनाधिकृत) शॉप व इमारत क्र. ०२ मधील २५ (अनाधिकृत) असे एकूण ५८ दुकानांना शटर बसविण्यात येऊन रहिवास ऐवजी वाणिज्य वापरासाठी तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरचे प्रकरण वापर बदलाचे आहे. यामध्ये कोणतेही चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले नसून महानगरपालिकेमार्फत मंजूर विकास योजना व मंजूर विकास नियंत्रण नियमावली नुसार परवानगी दिली असून, इमारतीस भोगवटा दाखला दिल्यानंतर इमारतीमधील सदनिका / दुकाने / गाळे विकणे, त्यांचे व्यवहार करणे याबाबी पूर्णत: विकासकामार्फत केल्या जातात तसेच मालमत्ता विक्रीच्या अनुषंगाने दस्त नोंदणी ही दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येते. प्रकरणी अनधिकृत वाणिज्य वापराअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत कारवाई करण्यात येत आहे.

**ब)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेतील मौजे नवघर, स.क्र.४५३पै., व इतर या मिळकतीमध्ये युनिक हाईटस या इमारतीस महानगर पालिकेने विकासक श्री. हर्षद पी. दोशी व श्री. मुध एच. दोशी यांना दि.२५/०७/२००८ अन्वये इमारत क्र.ओ-२ पार्ट स्टिल्ट + पोडियम + १२, इमारत ई-१०- स्टिल्ट + १२, इमारत क्र. ई-११- पार्ट स्टिल्ट + पोडियम + १२, ईमारत क्र.आर-१- तळमजला करीता बांधकाम परवानगी दिलेली आहे. तदनंतर महानगरपालिकेने दि.२६/०३/२०१० रोजी अन्वये उक्त सर्व इमारतींना भोगवटा दाखला दिलेला आहे.

युनिक हाईट्स इमारत टाईप ओ-२ या सोसायटीमधील काही सदस्य यांनी तत्कालीन प्रभाग समिती, प्रभाग कार्यालय क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना सदर सदनिकेचा रहिवाशी वापराचा बदल करून वाणिज्य वापर करीत असल्याचे कळवून त्यासाठी आवश्यक मालमत्ता कर भरणार असल्याचे पत्र दिलेले होते. तथापि, प्रभाग कार्यालयामार्फत सदर पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही झालेली नसल्याने सोसायटीधारक यांनी मा. उच्च न्यायालय, रिट याचिका क्र.८९४९/२०११ अन्वये दाखल केली असता मा. उच्च न्यायायालने दि.१९/०१/२०१२ अन्वये अर्जदार यांच्या दि.०१/१०/२०११ रोजीच्या अर्जावर निर्णय घेणेबाबत आदेश दिले. तथापि, महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या दि.०१/१०/२०११ च्या अर्जावर महानगरपालिकेकडुन कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

महानगरपालिकेकडे दि.११/११/२०२२ अन्वये प्राप्त झालेल्या तक्रारी अनुषंगाने महानगरपालिकेकडील संबंधित अधिकारी यांनी स्थळपाहणी केली असता, इमारत प्रकार ई-१० व ई-११ या इमारतीच्या तळमजला येथे वाहनतळाऐवजी अनधिकृत वाणिज्य दुकानेचा वापर सुरु आहे. तसेच इमारत प्रकार ओ-२ या इमारतीमध्ये पार्ट स्टिल्ट मध्ये रहिवास वापराऐवजी वाणिज्य वापर सुरु असून त्यामध्ये मंजुरी व्यतिरिक्त वाढीव बांधकाम असल्याचे आढळून आले नाही. वाणिज्य वापर विभागाच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील कार्यवाही करणेबाबत प्रभाग अधिकारी यांना दि.२२/११/२०२२ रोजी सदर जागेतील इमारत प्रकार ई-१०, ई-११ व ओ-२ या इमारतीमध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम झालेले नसून बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने पार्ट तळ येथील सदनिकांमध्ये रहिवास वापराऐवजी वाणिज्य वापर सुरु असल्याने सदर बांधकाम तोडणेची आवश्यकता राहत नसुन विना परवानगी वाणिज्य वापर बंद करणेबाबत महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

**क)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-घोडबंदर / नवघर या गावापैकी मौजे घोडबंदर या गावामधील एकूण सात (०७) वेगवेगळया रेखांकनास तत्कालीन नगरपालिका / महानगरपालिकेने वेळोवेळी रेखांकन मंजूरीसह बांधकाम परवानगी दिली होती. तसेच मौजे नवघर मधील एकूण नऊ (०९)

वेगवेगळया रेखांकनास तत्कालीन नगरपालिका / महानगरपालिकेने वेळोवेळी रेखांकन मंजूरीसह बांधकाम परवानगी दिली होती. सदरच्या एकूण १६ रेखांकनामध्ये मौजे घोडबंदर व मौजे नवघर येथील काही अतिरीक्त जमिनींचा समावेश करुन उक्त १६ रेखांकन व सदर अतिरीक्त जमिंनी यांचे एकत्रिकरण करुन एकत्रित रेखांकनासह बांधकामास महानगरपालिकेकडून विकासक मे. रवि डेव्हलपमेंट्स व इतर यांना दि.३०/०३/२०१९ रोजी अन्वये अटीशर्तीच्या अधिन राहून सुधारीत परवानगी देण्यात आलेली होती. त्यामध्ये काही जमिनीबाबत हरकती प्राप्त झालेल्या असल्याने महानगरपालिकेने सदर हरकतीच्या अनुषंगाने संयुक्त सुनावणी घेवून विकासकास दि.३०/०३/२०१९ अन्वये दिलेली परवानगी महानगरपालिकेने दि.१७/०६/२०१९ अन्वये रद्द केलेली आहे. तद्नंतर महानगरपालिकेने दि.२४/०६/२०१९ अन्वये सह.जिल्हा निबंधक वर्ग १ यांना व सह.दुय्यम निबंधक यांना सदर परवानगीतील इमारतीमधील सदनिका नोदंणीकृत करण्यात येवु नयेत असे कळविले आहे.

सदर परवानगी रद्द केलेल्या दि.१७/०६/२०१९ च्या आदेशा विरुध्द विकासक यांनी मा. दिवाणी न्यायालय, ठाणे येथे दावा क्र. आरसीएस-५७९/२०१९ दाखल केले असता, मा. न्यायालयाने दि.१७/०७/२०१९ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत. *"Defendant hereby restrained for taking coercive or forcible steps in respect of suit property on the basis of order dt.१७.०६.२०१९ of Commissioner of corporation till filing of say or next date which is later."*

प्रकरणी दरम्यानच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या दि.१७/०६/२०१९ च्या आदेशाने व्यथीत होवून विकासक यांनी तत्कालिन मा. मंत्री महोदय, नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये अपिल दाखल केले असता मा. मंत्री महोदय, नगर विकास यांनी दि. २१/०९/२०२० अन्वये अपिल अशंत: मान्य करुन उक्त हरकती/ तक्रारीमधील जमिनींचे क्षेत्र वगळता उर्वरीत क्षेत्रावर अर्जदार यांनी महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करावा व सदर प्रस्तावावर महानगरपालिकेने गुणवत्तेनुसार कार्यवाही करावी, असे आदेश दिले.

उपरोक्त आदेशानंतर विकासकाने दि.०३/११/२०२० अन्वये प्रस्ताव सादर केला असता, सदरचा प्रस्ताव महानगरपालिकेने दि.११/११/२०२० प्रस्ताव अपुर्ण असल्याने, प्रस्ताव मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार परिपूर्ण कागदपत्रांसह सादर केल्यास सदर प्रस्तावावर गुणवत्तेनुसार परवानगी बाबतची कार्यवाही करण्यात येईल असे कळविले होते.

उपरोक्त नमूद मा. न्यायालयाने दावा क्र.RCS-५७९/२०१९ मध्ये दिलेले आदेश कायम होते. तथापी मा.मंत्री महोदय, नगर विकास यांचे अधिनियमाचे कलम ४७ चे आदेश मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणल्यानंतर मा.न्यायालयाने जैसे थे आदेश वाढवून दिले नसल्याने विकासक यांना वेळोवेळी मंजूरी व्यतिरिक्त वाढीव बांधकाम करण्यात येवू नये असे कळविले असून, वाढीव बांधकामाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत प्रभाग अधिकारी यांना कळविण्यात आले होते. तसेच सदर विकासक यांनी दि.१९/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये रेराकडे प्रकल्प नोंदणीकरीता केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे अभिप्राय मिळणेची विनंती केली असता, महानगरपालिकेने दि.३०/०३/२०१९ अन्वये दिलेली परवानगी रद्द केली असल्याने सदरच्या परवानगीनुसारची माहिती महारेराकडे सादर करणे उचित नसल्याचे विकासक यांना कळविण्यात आले आहे.

महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी महानगरपालिकेने दि.१७/०६/२०१९ अन्वये बांधकाम परवानगी रद्द केली असल्याने महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगी नुसार दि.२५/०२/२०२५ अन्वये सह.जिल्हा निबंधक व सह.दुय्यम निबंधक यांना सदनिका नोंदणी न करण्याबाबत पुनश्चः कळविण्यात आले होते.

विकासक मे. रवि डेव्हलपमेट यांनी मा. मंत्री महोदय यांचेकडील दि.२१/०९/२०२० च्या आदेशाच्या अनुषंगाने सुधारीत परवानगी न घेता दि.३०/०३/२०१९ च्या परवानगीनुसार जागेवर बांधकाम केले असले तरी सदरची दि.३०/०३/२०१९ ची परवानगी रद्द करण्यात आली असल्याची बाब विचारात घेऊन प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.४ यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ अन्वये विकासक यांना दि.११/०६/२०२५ रोजी नोटीस दिली असता सदर नोटीसी विरुध्द विकासक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेविरुद्ध रिट याचिका क्र.२९४०/२०२४ दाखल करुन त्यामध्ये महानगरपालिकेने दि.११/११/२०२० तसेच दि.०९/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केलेली कार्यवाही तसेच मा. उच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र.१०२०५/२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१०/०१/२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेने कार्यवाही केली नसल्याने त्याबाबींसह मा.मंत्री महोदय, नगरविकास विभाग यांचेकडील दि.२१/०९/२०२० अन्वयेच्या आदेशानुसार जागेवर काम सुरु केले असल्याने शासनाकडील उपरोक्त आदेश विचारात घेणेची विनंती मा. उच्च न्यायालयास केली असता, मा. उच्च न्यायालयाने दि.०१/०७/२०२५ रोजी आदेश पारीत करुन त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१०२०५/२०२२ मधील दि.१०/०१/२०२३ रोजीचे आदेश विचारात घेऊन दि.३०/०३/२०१९ च्या परवानगीच्या आतील कोणतेही बांधकाम असल्यास ते संरक्षित केले जाईल असे मत नोंदवून महानगरपालिका आयुक्त यांनी सदर प्रकरणी अर्जदार यांचे अर्जावर ०६ आठवडयांमध्ये सदर प्रकरणी आदेश पारीत करणेचे निर्देश दिले आहेत.

उक्त मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने विकासक यांची दि.१८/०७/२०२५ व तदनंतर २८/०८/२०२५ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीच्या अनुषंगाने त्यांना सुनावणी दरम्यान विकासक यांनी दि.२९/१२/२०२५ च्या पत्रान्वये कागदपत्रे व त्याचे म्हणने सादर केल्यानंतर सदर प्रकरणी विकासक यांच्या प्रस्तावावर तत्कालीन आयुक्त यांनी उपरोक्त सर्व बाबी व घडामोडी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या दि.१७/०६/२०१९ रोजीच्या आदेशापुर्वी प्राप्त झालेल्या तक्रारी मधील सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रावरील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राच्या अनुषंगाने आवश्यक भरणा करावयाचे शुल्क, दंडणिय शुल्क, विकास शुल्क तसेच इतर शुल्का संबंधित एकत्रित रक्कमेचा भरणा ९० दिवसांमध्ये भरणेच्या अनुषंगाने इतर अटीशर्तीस अधीन राहून दि.२३/०१/२०२६ रोजी आदेश पारीत केले. सदर आदेशानुसार विकासक यांनी रकमेचा भरणा विभागाकडे अद्याप केलेला नाही.

प्रकरणी मे.रवि डेव्हलपर्स यांनी, महानगरपालिकेच्या दि.२५/०२/२०२५ रोजीच्या सह जिल्हा निबंधक व दुय्यम निबंधक मिरा भाईंदर यांना सदनिका नोंदणी न करणेबाबतच्या पत्राच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायालय ठाणे येथे दावा क्र.स्पे.सि.सूट २३३ अन्वये दाखल केला. मा. न्यायालयाने दि.१३/०८/२०२५ अन्वये तात्पुरता मनाई आदेश पारित केलेले होते तसेच सदर प्रकरणी दि.१२/०२/२०२६ अन्वयेच्या आदेशान्वये दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत महानगरपालिकेने दिलेल्या दि.२५/०२/२०२५ रोजीच्या पत्रावर कार्यवाही करण्यास तात्पुरते मनाई आदेश पारित करुन सदरचे आदेश संबंधित विभागांना कळविण्याचे निर्देश दिलेले होते. प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने विकासक यांनी

दि.१६/०२/२०२६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेडे केलेली विनंती विचारात घेवून महानगरपालिकेने त्यानुसार दि.११/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना सदर आदेशाच्या अनुषंगानेची वस्तुस्थिती जिल्हा निबंधक, दुय्यम निबंधक कळविण्यात आली आहे.

तद्नंतर विकासक यांनी विकासशुल्क व इतर शुल्काचा भरणा केलेला नसल्याने, विकासकास पुनश्च: दि.०८/०६/२०२६ अन्वये विकास शुल्क व इतर रक्कमेचा भरणा व्याजासह करणेबाबत विकासक यांना कळविण्यात आले असुन विकासकाने दि.१५/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये रक्कमेचा भरणा करणेच्या अनुषंगाने ३ महिन्यांची मुदत अपेक्षिलेली असून सदर प्रकरणी विकासकाकडून रक्कम भरणा करुन घेण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडून पाठपुरावा सुरु आहे.

**********

**लक्षवेधी सूचना क्र.२६०९**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**मा.श्री.किसन कथोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२६०९ पुढीलप्रमाणे आहे :-**

" ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील मौजे कशेळी येथील जमिन सर्वे नं.४८पे आणि ४६५ या जमिनीवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६च्या कलम ४५ अन्वये एमएमआरडीए प्राधिकरणाची कोणतीही बांधकाम परवानगी न घेता अनधिकृत व्यावसायिक बांधकाम केल्याप्रकरणी एमएमआरडीए मार्फत श्री.रुद्रप्रताप त्रिपाठी मौजे पुर्णा, ता.भिवंडी येथील अनधिकृत व बेकायदेशीर व्यावसायिक बांधकाम प्रकरणी तसेच श्री मौजे गुंदवली,दिवे अंजुर व भिवंडी तालुक्यातील इतर विविध ठिकाणी जमिनीवर व नाल्याच्या जमिनीवर अनधिकृत व्यावसायिक बांधकाम केल्याप्रकरणी कलम ५३(१)अन्वये विविध तारखांना नोटीसा बजाविण्यात आलेल्या असणे,त्याचप्रमाणे श्री.रूदप्रताप त्रिपाठी यांनी मौजे दापोडे, गुंदवली, ता.भिवंडी येथील जमिनीवर अनधिकृत व्यावसायिक बांधकाम केल्याप्रकरणी नारपोली पोलीस ठाणे येथील गुन्हा रजि क.॥ ४/ २०१०दि.०६/०१/२०१०नुसार आणि मौजे दिवे-अंजुर येथे कांदळवनाचा नाश करून अनधिकृत व बेकायदेशीर गोदामाचे बांधकाम केल्याप्रकरणी गुन्हा रजि क.॥५/२०१० दि.०६/०१/२०१०नुसार गुन्हा दाखल करण्यात येणे,याव्यतिरिक्त सदर इसमाने भिवंडी तालुक्यात अन्य ठिकाणी देखील अनधिकृत बांधकाम व मौजे दिवे-अंजूर ता.भिवंडी येथील सर्व्हे नं.२५२,२५३&२५४ या जमिनीवरील कांदळवन नष्ट करून त्यावर भराव केलेला असणे, सदर प्रकरणी वारंवार तक्रार करून देखील कांदळवन विभाग किंवा एमएमआरडीए यांनी भूमाफियाशी संगनमत करून उपरोक्त अनधिकृत बांधकाम निष्काषित केलेले नसणे,याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील दिनांक १७ मार्च, २००७ रोजीचे आदेशान्वये ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारित ६० गावे) भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (c) अन्वये 'विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण एम.एम.आर.डी.ए असुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार विकास योजना तयार केली असून शासनाने दिनांक ११ मार्च, २०१५ व दिनांक १४ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या अधिसूचनांनुसार सदर विकास योजना मंजूर केली आहे.

मौजे दापोडे येथील सर्व्हे क्रमांक २, ३, ४, १० व इतर, मौजे गुंदवली येथील सर्व्हे क्रमांक २ ते ६, १० ते २९ व इतर व मौजे दिवे अंजूर येथील सर्व्हे क्रमांक ४१ ते ४७ या जमिनीवरील गोदामांच्या बांधकामांबाबत विकासक श्री.रुद्रप्रताप त्रिपाठी व श्री.शिवा त्रिपाठी तर्फे इंडियन कॉर्पोरेशन यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अंतर्गत नोटीस बजाविण्यात आली होती. तसेच, त्यांच्या विरुद्ध उक्त अधिनियमातील कलम ४३ सह ५२ नुसार नारपोली पोलिस ठाणे भिवंडी

येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक II ०४/२०१० व II ०५/२०१० दिनांक ०६ जानेवारी, २०१० रोजी दाखल करण्यात आला होता.

दरम्यानच्या काळात मा. श्री. सुरेश टावरे, तत्कालीन खासदार, भिवंडी लोकसभा यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना भिवंडी तालुक्यातील ५१ गावांमधील एम.एम.आर.डीए. ने बजाविलेल्या नोटीसीस स्थगिती मिळण्याच्या अनुषंगाने दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजीच्या लेखी निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २००९ रोजीच्या पत्रान्वये भिवंडी तालुक्यातील ५१ गावांना एम.एम.आर.डी.ए. ने काढलेल्या नोटीसांना, याबाबत काही न्यायालयीन निर्णय असल्यास त्यास अधीन राहून पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली होती. तद्नंतर, शासनाने दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१० रोजीच्या पत्रान्वये उक्त दिनांक २९ ऑगस्ट २००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले स्थगिती आदेश केवळ जुन्या बांधकामांना जेथे बांधकाम वापर सुरु आहे अशा ठिकाणी लागू राहतील मात्र नवीन बांधकामे जेथे वापर सुरु नाही अशा ठिकाणी एम.एम.आर.डीए. ने अनधिकृत बांधकामावर नियमानुसार कार्यवाही करणेबाबत कळविले होते. तद्नंतर छाननी अंति शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २००९ व दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१० रोजीच्या समक्रमांकांच्या पत्रान्वये दिलेली स्थगिती दिनांक २३ मे, २०१२ रोजीच्या पत्रान्वये उठविण्यात आली

प्राधिकरणाने यानंतर बांधकामदार श्री रुद्रप्रताप त्रिपाठी यांनी मौजे गुंदवली तालुका भिवंडी येथील सर्व्हे क्रमांक ३१ ते ५१, ५३, ५५ व मौजे दिवे-अंजूर, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्रमांक ३६, ३७, ३८ या जमिनीवरील केलेल्या गोदामांच्या बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अंतर्गत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१२ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर प्राधिकरणाकडून विकसक यांनी मौजे दापोडे, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्रमांक २, ३ व इतर मौजे गुंदवली सर्व्हे क्रमांक २ ते ६, व इतर व मौजे दिवे-अंजूर, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्रमांक ४१ ते ४७ याठिकाणी तसेच नाला जमिन, पाणथळ जमिन, CRZ बाधित जमिन, शासकीय जमिन व इतर ठिकाणी बांधकाम निषिद्ध असलेल्या क्षेत्रातील जमिनीवर केलेल्या गोदामांच्या अनधिकृत बांधकामांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम तसेच भारतीय वन अधिनियमा अंतर्गत संबंधित बांधकामदार यांच्या विरुद्ध आवश्यक कारवाई करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे व मुख्य वन संरक्षक, ठाणे यांना दिनांक ४ डिसेंबर, २०१२ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर ठिकाणी असलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाकडून वेळोवेळी कारवाई करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली होती. तथापि विकासक यांनी प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाही विरुद्ध भिवंडी दिवाणी न्यायालय येथे दिवाणी दावा क्रमांक ४७२/१२, ७४२/१२ असे विविध दावे दाखल करण्यात आले होते. यात मा. न्यायालयाने तात्पुरते मनाई आदेश/ जैसे थे बाबतचे आदेश पारित केले असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून निष्कासनाची कारवाई करता आली नाही.

प्राधिकरणाने यानंतर विकासक यांनी मौजे कशेळी येथील सर्व्हे क्रमांक ४६ व ४८ या जमिनीवरील गोदामांच्या बांधकामाबाबत दिनांक ०९ मार्च, २०१६ व १० ऑक्टोबर, २०१७ रोजी, मौजे पूर्णे, ता. भिवंडी येथील येथील सर्व्हे क्रमांक ८१,८२,८३,८४ व ८५ या जमिनीवरील गोदामांच्या बांधकामाबाबत दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ व ०३ मे, २०१८ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) अंतर्गत नोटीस दिली होती. लक्षवेधी सूचनेत नमूद मौजे दिवे-अंजूर, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्रमांक २५२, २५३ & amp; २५४ हि जमिन वन खात्याची असल्याचे ७/१२ अभिलेखावरून दिसून येते.

प्राधिकरणाने "महाराष्ट्र नगररचना (कंपाउंडेड स्ट्रक्चर्स) नियम, २०१७" आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ (अ) अन्वये, अनधिकृत बांधकामांवर 'कंपाउंडिंग शुल्क' आकारून त्यांना "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या सूचनेद्वारे अर्ज मागविले असता, विकासक यांनी दिनांक २२ मे, २०१८, दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ आणि दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अर्जान्वये मौ. गुंदवली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. २ ते ५५, मौ. दापोडे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १, २, ४ व इतर, मौ. दिवे-अंजुर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ३९, ४०, ४२, ४३ व इतर, मौ. मानकोली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ९४, ९५, ९६ व इतर, मौ. पूर्ण, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ८० ते ९०, मौ. कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ४५, ४६, ४८ या जमिनींवरील औद्योगिक आणि गोदामांच्या अनधिकृत बांधकाम "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. तथापि, आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याने सदरचा प्रस्ताव प्राधिकरणाने दिनांक ११ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये ना मंजुर केला आहे.

त्यानंतर, विकासक यांनी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये सदर बांधकामे नियमानुकुल करणेबाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केला, प्राधिकरणाने सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता देऊन वैधानिक शुल्कांच्या भरणा करणेबाबत विकासक यांना दिनांक २८ मे, २०२१ व दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ रोजी मागणी पत्रे जारी केली. परंतु, अर्जदाराने आवश्यक असलेली संपूर्ण शुल्क रक्कम भरली नसल्यामुळे, त्यांना 'तत्वतः मंजुरी'चे पत्र जारी करण्यात आले नाही.

त्यानंतर, प्राधिकरणाच्या दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या नियमितीकरण धोरणानुसार विकासक यांनी दिनांक ०१ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये, मौ. गुंदवली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. २ पै. व इतर, मौ. दापोडे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. १, २ व इतर, मौजे दिवे-अंजुर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र.२८ व इतर, मौ. मानकोली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ९२ पै., ९३ पै. व इतर, मौ. पूर्णा, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ८२ पै व इतर, या जमिनींवरील औद्योगिक आणि गोदामांच्या अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरणाने दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या परवानगी पत्रान्वये अटी शर्तीसह मंजुरी दिलेली आहे. तथापि, विकासकाने सदर शर्तीची पुर्तता न केल्याने प्राधिकरणाने दिलेली दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजीची नियमितीकरण परवानगी आपोआप रद्द झाल्याबाबत दिनांक १० जुन, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विकासकास कळविले आहे. त्यानुसार, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनधिकृत ठरलेल्या सदर बांधकामांवर पुढील कार्यवाही एम.एम.आर.डी.ए मार्फत करण्यात येत आहे.

***************

992
५/३९१

(१८४८)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. काशिनाथ दाते व श्री.विजयबापू शिवतारे, माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८४८.**

---

"राज्यातील धरणांमध्ये वर्षानुवर्षे गाळ साचत आल्याने धरणांची पाणी साठवणूक क्षमता मोठ्या प्रमाणावर घटलेली असणे, साठवणूक क्षमतेच्या सुमारे १४.८३ टक्के गाळ साचला असणे, त्यामुळे साठवणूक क्षमता २७९ टीएमसीने कमी झाली असून साठवणूक क्षमता १८७८ टीएमसी असली तरी प्रत्यक्षात १५९९ टीएमसीपर्यंत खाली आली असल्याचे माहे जून २०२६ रोजी निदर्शनास आलेले असणे, मुंबईला एका वर्षाला ५० टीएमसी, तर पुण्याला २२ टीएमसी पाण्याची गरज असते त्यामुळे मुंबईला पाच वर्षे आणि पुण्याला १२ वर्षे पुरेल इतकी साठवणूक क्षमता गाळ साचून वाया गेली असणे, राज्यात मोठे, मध्यम आणि लघु एकूण ३०२८ धरण प्रकल्प असणे, मात्र काही धरणांतील गाळाचे प्रमाण ५०-६० टक्क्यांवर असणे, केंद्रीय जल आयोग आणि मेरी संस्थेने यापूर्वीच राज्यातील जलाशयांमधील गाळाचे प्रमाण वाढत असल्याचे जलसंपदा विभागाच्या निदर्शनास आणून दिलेले असणे, केंद्रीय जल आयोगाने २०२४च्या अहवालात राज्यातील प्रमुख ४८ जलाशयांतील गाळाचे प्रमाण सरासरी १४.८३ टक्के असल्याचे म्हटले असणे, महाराष्ट्र हे पाण्याचे लेखा परीक्षण करणारे देशातील पहिले राज्य असले तरी प्रत्यक्षात पाण्याचे लेखा परीक्षण आणि जल नियोजन चुकीच्या आकडेवारीवर केले जात असल्याचे दिसून येणे, गाळ साचल्याने धरणे उथळ होऊन बाष्पीभवनाचा वेग वाढणे, साठवणूक क्षमतेत घट झाल्याने एकूण जलसिंचन क्षमताही सुमारे १५ टक्क्यांनी कमी होणे, सबब धरणातील साचलेला गाळ शेतीसाठी वापर करून पाण्याचे अचूक नियोजन करणेबाबत शासनाकडून करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा.मंत्री (जलसंपदा)( गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे निवेदन

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या अंतर्गत असलेल्या संपदा अभियांत्रिकी केंद्रामध्ये सुदूर संवेदन तंत्र, Differential Global Positioning System (DGPS) व Bathymetry या तंत्रांचा वापर करून महाराष्ट्रातील मोठया व मध्यम प्रकल्पांचे गाळ सर्वेक्षण क्षेत्रिय अधिका-यांच्या मागणी अनुसार करण्यात येते.

राज्यात असलेल्या एकुण ३६९७ प्रकल्पांपैकी मोठे व मध्यम असे ३८४ प्रकल्प असुन उर्वरीत ३३१८ हे लघु प्रकल्प आहे. यापैकी जलसंपदा विभागामार्फत सन १९७४ पासुन आतापर्यत महाराष्ट्रातील एकुण ३५३ सर्वेक्षणांव्दारे १७६ जलाशयांचे गाळ सर्वेक्षण उपरोक्त पध्दतीचा वापर करून करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील गोदावरी, कोकण, कृष्णा व तापी या चारही खो-यामधील गाळ सर्वेक्षण केलेल्या १७६ प्रकल्पांच्या जिवत पाणीसाठया मध्ये आढळून आलेली सरासरी घट ७.२९% अशी आहे.

केंद्रीय जल आयोग, दिल्ली यांनी मोठे व मध्यम असे ५० प्रकल्पांचे सर्वेक्षणांचे काम बाह्ययंत्रणेव्दारे सन २०२२ ते २०२४ या कालावधी पुर्ण केले. या कामासाठी मेरी संस्थेने संबंधीत क्षेत्रिय प्रकल्पांचे व्यवस्थापन करणारे विभाग व केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांचे मध्ये नोडल एजन्सी म्हणुन काम केले. या सर्व ५० प्रकल्पांमधील संकल्पीत एकुण पाणीसाठा ८७०.९७ टि.एम.सी.व संकल्पीत जिवत पाणीसाठा ७००.९५ टि.एम.सी. असुन अभ्यासलेला संकल्पीत एकुण पाणीसाठा ७७५.१७ टि.एम.सी. व अभ्यासलेला संकल्पीत जिवत पाणीसाठा ६४९.८१ टि.एम.सी. एवढा आढळून आला. तसेच एकुण पाणीसाठयातील घट ९६.८३ टि.एम.सी. व जिवंत पाणीसाठयातील घट ५१.०१ टि.एम.सी. इतकी आढळून आली आहे.

महाराष्ट्रातील लघु प्रकल्पांचे सर्वेक्षणांचे काम हे महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेमार्फत केले जात नसुन हे काम क्षेत्रिय प्रकल्पांचे व्यवस्थापन करणाऱ्या विभागाकडून करण्यात येते.

महाराष्ट्र राज्यातील निवडक प्रकल्पांचे दरवर्षी नमुना (Sample) आधारावर जललेखा परीक्षण हे मुख्य लेखा परीक्षक, जल व सिंचन, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयामार्फत करण्यात येते. प्रकल्पात दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या पाणीसाठ्यापैकी बिगर सिंचन व इतर पाणी आरक्षण वगळता शिल्लक असलेल्या पाणीसाठ्यावर सिंचनाचे उद्दिष्टाप्रमाणे व शेतकऱ्यांचे मागणी नुसार क्षेत्रीय कार्यालयामार्फत/कालवा सल्लागार समिती यांच्या सल्ल्यानुसार जल नियोजन करण्यात येते.

जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक २२.०६.२०२६ नुसार राज्यातील ७ मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू निष्कासन करून पाणीसाठा पुनर्स्थापित करण्याबाबतचे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच अशासकीय संस्था, एनजीओ , ग्रामस्थ, शेतकरी यांच्याकडून धरणातील गाळ काढण्याबाबत प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पातील गाळ हा शेतकऱ्यांनी स्वखर्चाने वाहतूक करून त्यांच्या स्वतःच्या शेतात टाकण्यासाठी कोणतेही स्वामित्व शुल्काची आकारणी न करता गाळ वापरण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

शासनाने राज्यातील लघु व मध्यम प्रकल्पातील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे दि.२०.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये "गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजना" राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेनुसार गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत ग्रामपंचायत व अशासकीय संस्थांच्या मागणीनुसार तलावातील गाळ उपसा करण्याची कार्यवाही करणेत येते.

*******************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२६ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. २४५०**

श्री. आशुतोष काळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४५० पुढीलप्रमाणे आहे:-

" अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव हा तालुका शैक्षणिक दृष्टया प्रगत असणे, तालुका व परिसरात सुशिक्षित बेरोजगार, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या युवकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, तालुक्यात मोठे उद्योग नसल्यामुळे हजारो सुशिक्षित बेरोजगार व कुशल कामगार रोजगार संधीच्या शोधात परराज्यात व परजिल्ह्यात स्थलांतरीत होत असणे, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन कुटुंबाचे स्थलांतर ही एक गंभीर सामाजिक समस्या निर्माण होणे, तालुक्यात रेल्वे, विमानतळ, समृद्धी महामार्ग व इतर दोन राष्ट्रीय महामार्ग ई. ची दळण-वळणाची सुविधा उपलब्ध असणे, कोपरगाव शहरालगत एम आय डी सी उभारणे बाबत अनेक वर्षांपासून सातत्याने मागणी होत असणे, जागे अभावी या बाबत अद्यापी ठोस निर्णय न होणे, कोपरगाव शहरालगत डेअरी पोल्ट्री अँड ब्रिडींग फार्म व ॲग्रीकल्चर कॅटल ब्रिडींग सेंटर फर्मची सुमारे १०१ हेक्टर एवढी जमीन उपलब्ध असणे, सदर जमीन एम आय डी सी उभारण्यासाठी व्यावहारिक व तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे, सदरील जमीन हस्तान्तरीत करून त्या जागेवर एम आय डी सी उभारण्याची आवश्यकता, शासनाचे या कडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी सुशिक्षित बेरोजगार व कुशल कामगारामध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

कोपरगाव शहरानजीक असलेल्या डेअरी पोल्ट्री अँड ब्रिडिंग फार्मच्या मालकीची ८६.४० हेक्टर व ॲग्रीकल्चर कोपरगाव कॅटल ब्रिडिंग सेंटर फार्मच्या मालकीची १५.१९ हेक्टर अशी एकूण १०१.५९ हेक्टर (२५४ एकर) जागा उपलब्ध आहे. सदरची एकूण १०१.५९ हेक्टर (२५४ एकर) जमीन शिर्डी एम.आय.डी.सी.कडे वर्ग करण्याकरीता श्री. आशुतोष अशोकराव काळे, मा. विधानसभा सदस्य, कोपरगाव यांनी श्री. राधाकृष्णजी विखे पाटील, मा. मंत्री जलसंपदा व लाभ क्षेत्र विकास विभाग तथा पालकमंत्री, अहिल्यानगर यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनावर मा. पालकमंत्री यांनी "प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, अहिल्यानगर यांनी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनास सादर करावा" असे निर्देश दिलेले आहेत.

सदर निर्देशांच्या अनुषंगाने म.औ.वि. महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर मार्फत दि.०८/ ०५/ २०२५ रोजी मौजे-कोपरगाव येथील गट नं. २३०, २३१, ३७, ३८, न ३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७ व ४८ या गटातील डेअरी पोल्ट्री अँड ब्रिडिंग फार्मच्या नावे क्षेत्र ८६.४० हे. आर तसेच मौजे-सवंत्सर ता. कोपरगाव येथील गट नं. २०१ ॲग्रिकल्चर कोपरगाव कॅटल ब्रिडिंग सेंटर फर्मच्या नावे क्षेत्र १५.१९ हे. आर असे एकूण १०१.५९ हे.आर क्षेत्रावर एमआयडीसी स्थापन करण्यासाठी जमिनीची प्राथमिक पाहणी केली आहे. सदर पाहणी केलेली जमीन महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळ, नागपूर व जिल्हा पशुसंवर्धन विभाग अहिल्यानगर यांचे कडून म.औ.वि. महामंडळास हस्तांतर होणे आवश्यक आहे.

त्यानुसार म.औ.वि.महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत दि.२८/०५/२०२५ व १७/०६/२०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळ, नागपुर व जिल्हा पशुसंवर्धन विभाग, अहिल्यानगर यांचेकडून सदरील जमीन महामंडळास हस्तांतर होईल किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. तथापि, सदरील अभिप्राय अद्यापपर्यंत अप्राप्त आहेत. पशुसंवर्धन विभागाकडून अभिप्राय प्राप्त होताच जमीन हस्तांतरणाबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची तजविज म.औ.वि. महामंडळाकडून ठेवण्यात आली आहे.

************************

/५

**लक्षवेधी सूचना क्र.२७६३**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), श्री.नारायण कुचे, श्री.अर्जुन खोतकर मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२७६३ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांमध्ये जालना जिल्हयासह राज्यात मोठ्या प्रमाणावर कथित गैरव्यवहार झाला असणे, पात्र कामगारांऐवजी अपात्र व बोगस लाभार्थ्यांना लाभ मंजूर करणे, बनावट नोंदणी, खोटी कागदपत्रे, दलालांमार्फत अवैध वसुली, तसेच घरगुती भांडी वाटप योजनेतील साहित्य अधिकृत वितरणाऐवजी इतरत्र वळविण्यात आल्याचे आरोप करण्यात आले असणे, मृत्यू लाभ योजनेत इतर जिल्हयात २००-३०० एकूण प्रकरण असणे, जालना जिल्हयात २,२०० हून अधिक मंजुर प्रकरणांपैकी ३४० पेक्षा अधिक प्रकरणे संशयास्पद व बोगस असणे, प्रत्येकी रुपये २.६० लाखांप्रमाणे सुमारे रुपये ८.८४ कोटींच्या अनुदानाबाबत चौकशीची मागणी करण्यात आली असणे, परतुर तालुक्यातील दैठणा बुद्रुक येथील लेखी तक्रारीनुसार ९ पैकी ६ लाभार्थी काल्पनिक असणे, विवाह सहाय्य, शिष्यवृत्ती व घरकुल सहाय्य योजनांमध्येही दलालांमार्फत लाभ मिळण्याअगोदर ५०% रक्कम वसूल केली जात असणे, तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्या तात्काळ निलंबनासह कार्यकाळातील सर्व लाभ मंजुरी, लाभार्थी यादी, बँक व्यवहार, साहित्य वितरण, पोर्टलवरील नोंदी व कागदपत्रांचे विशेष लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता असणे, प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी, दलाल व इतर जबाबदार व्यक्तिंवर प्रचलित कायद्यांनुसार कठोर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

### मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

इमारत व इतर बांधकाम व्यवसायातील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमाखालील कलम १८ नुसार राज्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाचे कामकाज हे सन २०२० पासून ऑनलाईन पद्धतीने सुरु झालेले आहे. तसेच मंडळामार्फत कामगारांच्या सोईकरीता तालुकास्तरावर तालुका सुविधा केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणी, नुतणीकरण व लाभाचे अर्ज हे ऑनलाईनद्वारे सादर करण्यासाठी व अद्यावत करण्यासाठी मंडळाचे www.mahabocw.in हे संकेतस्थळ उपलब्ध आहे. ऑनलाईनद्वारे नोंदणी, नुतणीकरण व लाभाचे अर्ज कामगार स्वतः भरु शकतात किंवा अद्यावत करु शकतात. तसेच नोंदणी व नुतणीकरणासाठी मंडळाच्या निकषानुसार रहिवासी पुरावा, मागील ०१ वर्षामध्ये ९० दिवस किंवा ९० दिवसापेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणुन काम केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच कामगाराचा सक्रीय मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे. नोंदणी करतेवेळी त्यावर सत्यता पडताळणी करीता ओटीपी दिला जातो.

जुलै २०२० पासून मंडळाकडील नोंदणी, नुतणीकरण व DBT in Cash प्रकारच्या योजना अर्जांचे कामकाज मंडळाच्या एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणालीव्दारे (IWBMS) सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार सदर प्रणालीव्दारे कामकाजाची कार्यपध्दती वेळोवेळी विहीत करण्यात आली होती. बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी व अशिक्षित कामगारांना अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी राज्यभरात ३७ जिल्हा सुविधा केंद्रे व ३७६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण केली आहेत.

नोंदणी, नुतनीकरणामध्ये वाढ करण्यासाठी सदर प्रणालीवर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढण्याच्या दृष्टीने मंडळाच्या दि.०५.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाच्या अर्जांकरिता सर्वंकष कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार, बांधकाम कामगार ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून कोणत्याही ठिकाणावरून अथवा मंडळाच्या सुविधा केंद्रावरून निशुल्क अर्ज करू शकतात. नोंदणी, नुतणीकरणसाठी अर्ज सादर केल्यानंतर, अर्जदाराने अर्जासोबत सादर केलेल्या मुळ कागदपत्रांची तालुका सुविधा केंद्रावर तपासणी करण्याकरिता त्यांच्या सोईचा निश्चित दिनांक Appointment निवडण्याची मुभा देण्यात आली असून, निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार तालुका सुविधा केंद्रावर मूळ

कागदपत्रांच्या तपासणीकरिता हजर राहील व ऑनलाईन फोटो व बायोमॅट्रीक घेतले जाते. सदरहू मूळ कागदपत्रांच्या तपासणीअंती कागदपत्रे योग्य असल्यास संबंधित नोंदणी अधिकारी नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप अर्ज मंजूर करेल अथवा मूळ कागदपत्रे अयोग्य असलेल्या प्रकरणी संबंधित नोंदणी अधिकाऱ्याकडून कागदपत्रे अपुर्णाचा शेरा नोंदवून अर्ज नाकारण्यात येईल व तसा लघुसंदेश संबंधित अर्जदाराच्या मंडळाकडे नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठविला जाईल. अशा प्रकारे माहे जुलै, २०२० पासून नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाची संपुर्ण प्रक्रिया सदर प्रणालीव्दारे करण्यात येते व विविध योजनेचे लाभ ऑनलाईन स्वरूपात देण्यापूर्वी कामगाराने दाखल केलेल्या मुळ कागदपत्राची पडताळणी कामगार सुविधा केंद्रामार्फत केली जाते. त्यामुळे अर्जाची संपुर्ण प्रकिया पारदर्शक व सुलभ करण्यात आल्याने एंजट/दलाल इत्यादी त्रयस्थांकडून मंडळाच्या नोंदणी/नुतनीकरणासाठी हस्तक्षेपाचा वाव दिसून येत नाही.

तथापि, विविध कामगार संघटना, मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून मंडळाच्या नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप प्रक्रियेमध्ये काही खाजगी व्यक्ती/संस्था/दलाल/एजंट यांचेकडून बोगस कागदपत्रे,कामगारांकडून पैशाची मागणी व कामगारांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या प्राप्त तक्रारी, तसेच बोगस कागदपत्रे इलेक्ट्रानिक मिडीया व विविध समाज माध्यमांमध्ये प्रसारित होत असल्याची बाब मंडळाच्या निदर्शनास आल्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार मंडळाने दि.२५.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मंडळातर्गत बोगस कागदपत्रे/दलाल यांचेविरूध्द दक्षता पथकामार्फत विशेष तपासणी मोहिम राबविण्याचे सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, विभागनिहाय गठीत केलेल्या दक्षता पथकामार्फत विविध खाजगी व्यक्ती/संस्था/दलाल यांचे विरूध्द बनावट शिक्के, सही, कागदपत्रे इ.कारणांकरिता गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

जालना अंतर्गत नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी संचाचे वितरण केले जाते. या वितरण कार्यप्रणाली मध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याने सरकारी कामगार अधिकारी, जालना यांच्यामार्फत दिनांक २४.०४.२०२६ रोजी १) श्री. अनिल नरहरी मुळे २) श्रीम. सरीता मारोती खंदारे ३) मारोती खंदारे ४) अपसर शेख या खाजगी इसमा विरुद्ध पोलीस स्टेशन परतुर येथे FIR (गुन्हा) दाखल करण्यात आलेला आहे. तसेच गृहपयोगी संच वाटप करणारे संबंधित संस्थेचे जालना येथील मोरेश्वर गोडाऊन, न्यु एमआयडीसी एरीया गट नंबर २२४, भक्ती ऑईल मिलच्या पाठीमागे जालना यांचे कर्मचारी श्री. सचिन गोवधर्न वाहुळकर यांचेविरुद्ध लाचलुचप्रत प्रतिबंध विभाग, जालना यांनी गुन्हा दाखल केलेला असुन प्रस्तुत प्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.

नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२,००,०००/-, अंत्यविधी करिता रू. १०,०००/- व विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराच्या विधुर पतीस रू.२४,०००/- (५ वर्षांकरिता) अर्थसहाय्य दिले जाते. यामुळे योजनेअंतर्गत उक्त नमुद २.६० लाख ऐवजी जास्तीत जास्त रक्कम रु.२,३४,०००/- दिले जातात. जालना जिल्हयात मृत्यु लाभ २२०० हून अधिक मंजुर प्रकरणापैकी ३४० पेक्षा अधिक प्रकरणे संशयास्पद व बोगस असणे, प्रत्येकी २.६० प्रमाणे सुमारे ८.८४ कोटी च्या अनुदानाबाबत चौकशीची मागणी करण्यात आली आहे. या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, जालना जिल्हयाअंतर्गत नोंदणीकृत कामगारांचा नैसर्गिक मृत्यू (वय वर्ष ५१ ते ६०) या अर्थसहाय्य मिळण्याबाबत योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या एकुण २२५५ कामगारांपैकी २१८० कामगारांच्या मृत्यू प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाला सत्येतेबाबत मंडळामार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे १७३ लाभार्थ्यांची मृत्यू प्रमाणपत्राची संबंधित विभागाने/ग्रामपंचायत कार्यालयाने केलेली असुन त्यापैकी १०१ लाभार्थी वारसदाराची कागदपत्रे बोगस असल्याबाबत निर्दशनास आले आहे. या १०१ बोगस लाभार्थी वारसदाराकडून त्यांना देण्यात आलेली या योजनेची रक्कमेबाबत वसुली करण्याची कार्यवाही जालना कार्यालयाकडून सुरु करण्यात आली आहे. तसेच संबंधित मृत्यू प्रमाणपत्र देण्याऱ्या ग्रामपंचायत कार्यालयांना देखील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच उर्वरीत लाभार्थी वारसदारांची कागदपत्राची ग्रामपंचायत कार्यालयाकडून पडताळणीअंती बोगस लाभार्थी वारसदारांविरुद्ध नियमानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. दक्षता पथक जालना यांनी बोगस कागदपत्रे सादर केलेल्या वरील १०१ पैकी ५ वारसदाराच्या विरुद्ध फौजदारी स्वरूपाची गुन्हे दाखल केलेली आहे.

परतुर तालुक्यातील दैठणा बुद्रुक येथील लेखी तक्रारीनुसार ९ पैकी ६ लाभार्थी काल्पनिक असणे, विवाह सहाय्य, शिष्यवृत्ती व घरकुल सहाय्य योजनांमध्येही दलालांमार्फत लाभ मिळण्याअगोदर ५०% रक्कम वसूल केली जात असणे या नमूद बाबीसंदर्भात कार्यालयीन अभिलेखावरून असे निर्देशनास आले आहे की, परतुर तालुक्यातील उक्त नमुद प्रकरणी लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच, जालना कार्यालयाकडून, सरकारी कामगार अधिकारी जालना, तसेच दक्षता पथकाकडुन वेळोवेळी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे. यामुळे सदरहू अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करणे संयुक्तींक होणार नाही.

***********

१७०७

ट्/३-९५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे द्वितीय अधिवेशन

**मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. मोहन मते व श्री. राजु तोडसाम विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १७०७.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील अतिदूर्गम जिवती तालुक्यातील घोडनकप्पी या आदिवासीबहुल गावात दिनांक १८ जून २०२६ रोजी रस्त्याअभावी एका २५ वर्षीय गर्भवती महिलेचा मृत्यू होणे, संगीता तुळशीराम गेडाम या नऊ महिन्यांच्या गर्भवती महिलेस प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर गावाला बारमाही रस्ता नसल्याने डोंगर-दऱ्या व पायवाटांमधून उपचारासाठी हलवावे लागणे, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच रस्त्यात प्रसूती होऊन बाळाचा जन्म होणे, त्यानंतर मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू असतानाही वेळेत वैद्यकीय मदत व रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध न होणे, उपचाराअभावी संबंधित महिलेचा मृत्यू होणे, या घटनेमुळे दुर्गम व आदिवासी भागातील रस्ते, आरोग्य व आपत्कालीन सेवांची दयनीय अवस्था पुन्हा समोर येणे, अशा घटना वारंवार घडूनही मूलभूत सुविधांबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**श्री. प्रकाश आबिटकर, मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन**

मौजे घोडणकप्पी हे गाव उपकेंद्र भारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पाटण अंतर्गत येते. सदर गाव हे भौगोलिक दृष्ट्या डोंगराळ भागात वसलेले असून त्या ठीकाणी अंदाजे २० ते २५ घरे व १०० ते १२० लोकांची वस्ती आहे. सदर गावात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णवाहिका ज्या ठीकाणापर्यंत पोहचते त्या ठीकाणावरुन सुमारे १.५ ते २ किलोमीटर खाली उतरून सदर वस्तीत जावे लागते.

मयत श्रीमती संगीता गेडाम यांची दिनांक ०२ जानेवारी, २०२६ रोजी रुग्णालयात नोंदणी केली असून तिच्या दि. ०२/०१/२०२६, ०६/०२/२०२६, ०६/०४/२०२६ व दिनांक ०५/०६/२०२६ अशा चार वेळा तपासण्या करण्यात आल्या होत्या. दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ५:३० वाजता गरोदरमातेच्या नातेवाईकांनी आशा स्वयंसेविकेस दुरध्वनी व्दारे प्रसूती कळा सुरु आल्याबाबत माहिती दिली. आशा स्वयंसेविकेने वैद्यकिय अधिकारी, पाटण यांना तात्काळ माहिती दिली. वैद्यकिय अधिकारी यांनी रुग्णवाहिका तात्काळ पाठवली आणि स्वतः आरोग्य सेविकेला घेऊन स्वतःच्या वाहनाने ज्या ठिकाणा पर्यंत रुग्णवाहिका पोहचते त्या ठिकाणा पर्यंत पोहचले. परंतु, गरोदर माता तिथे पोहचली नसल्याने व रुग्णवाहिका सदर मातेच्या घरापर्यंत पोहचू शकत नसल्याने, वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सेविका प्रसूती करिता आवश्यक असलेले साहित्य

घेऊन सकाळी ६.१५ वाजेपर्यंत गरोदर मातेच्या घरी पोहचले. तोपर्यंत सदर मातेची प्रसूती झाली होती आणि तीने २.२ किलो वजनाच्या मुलीला जन्म दिला होता. परंतू सदर माता कोणतीही हालचाल करत नव्हती. त्यामुळे वैद्यकिय अधिकारी यांनी तात्काळ IV लावले, CPR, Mouth to Mouth Respiration असे उपचार करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांना यश आले नाही. तद्नंतर वैद्यकिय अधिकारी यांनी सदर मातेला मृत घोषित केले. मौजे चिलाटीगुडा येथून मालवाहू गाडी बोलविण्यात आली व मृत महिलेचा देह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, गडचांदुर येथे पाठविण्यात आला. शवविच्छेदन अहवालानुसार सदर मातेचा मृत्यु हा प्रसूतीपश्चात अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे झाला असे निष्पन्न झाले आहे.

मौजे घोडनकप्पी या गावात आरोग्य सेविका व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांना साप्ताहिक भेट देण्याबाबत निर्देशीत करण्यात आले आहे. तसेच मोबाईल मेडीकल युनिट, जिवती यांना सदर गावाला दरमहा भेट देण्याबाबत निर्देशीत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविकेला गावात दररोज भेटी देण्याचे तसचे आशा वर्कर यांना एक दिवस आड भेटी देण्याचे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य, पाटण यांना प्रत्येक पंधरा दिवसाला भेटी देण्याचे निर्देशीत करण्यात आले आहे. सदर गावातील सर्व गर्भवती महिलांना माहेर घर योजनेचा १०० टक्के लाभ घेण्याकरीता समूपदेशन करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे. सर्व गरोदर माता व त्यांच्या घरच्या नातेवाईकांना १०२ अम्बूलन्स ड्रायव्हर चे मोबाईल नंबर देण्यात आलेले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुका आदिवासी क्षेत्रात येतो. TSP अंतर्गत तसेच जिल्हा सर्वसाधारण योजने अंतर्गत दरवर्षी जिवती तालुक्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे जिवती तालुक्यातील नागरिकांना आवश्यकतेप्रमाणे आरोग्य सुविधा व औषध पुरवठा केला जातो. या तालुक्यातील आरोग्य संस्थाची देखभाल दुरुस्ती जिल्हा परिषद, चंद्रपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते.

**********************************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२६ चे व्दितीय अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. धर्मरावबाबा आत्राम विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २६७१ पुढीलप्रमाणे आहे:
"गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथील नवनिर्मित महिला व बाल रुग्णालयाचे लोकार्पण होऊन सुमारे सहा ते सात महिने उलटले तरी, तेथे आवश्यक वैद्यकीय तज्ज्ञ, डॉक्टर, परिचारिका आणि तंत्रज्ञांची महत्त्वपूर्ण पदे आजही रिक्तच असल्याची बाब माहे जून, २०२६ मध्ये निदर्शनास आली असणे, कोट्यवधी रुपये खर्चुन अत्याधुनिक इमारत उभारली असतानाही केवळ आवश्यक मनुष्यबळाअभावी येथील आरोग्य सेवा पूर्णतः विस्कळीत झाली असणे, परिणामी दुर्गम व आदिवासी भागातील गर्भारमाता, नवजात बालके व लहान मुलांना उपचारासाठी अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागत असून आपत्कालीन स्थितीत रुग्णांना दूरच्या खाजगी रुग्णालयांत हलवावे लागत असल्यामुळे जनतेचा वेळ आणि पैसा वाया जात असणे, प्रशासनाच्या या अक्षम्य हलगर्जीपणाविरोधात आणि मूलभूत आरोग्य हक्कासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी दिनांक २९ जून २०२६ रोजी रुग्णालयाला 'ताला ठोको' आंदोलन पुकारले असणे, शासनाच्या या नियोजनशून्य कारभारामुळे संपूर्ण अहेरी क्षेत्रात पसरलेली तीव्र चिंता व प्रचंड संताप, यास्तव, या रुग्णालयातील सर्व रिक्त पदे तातडीने भरुन रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत, त्रुटींना जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

मा. श्री. प्रकाश अबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन:-

नागपूर परिमंडळांतर्गत असलेल्या अहेरी हे गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त व आदिवासी बहुल क्षेत्र असून तेथील माता व बालकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले असून, महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथे ४२ नियमित पदे तसेच ५५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयात मंजूर ४२ नियमित पदांपैकी १७ नियमित अधिकारी/कर्मचारी यांची पदे भरलेली आहेत. तसेच, ०२ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, ०३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतर तात्पुरती पदस्थापना देण्यात आली असून त्यात ०१ क्षकिरणतज्ञ, ०१ बधिरिकरणतज्ञ यांचा समावेश आहे. ०२ वैद्यकीय अधिकारी ( स्त्रीरोगतज्ञ ) आयपीएचएस अंतर्गत भरलेली आहेत. तसेच, बाह्य यंत्रणेव्दारे भरावयाच्या ५५ पदांपैकी ५२ पदे भरलेली आहेत. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांच्या स्तरावरून ०७-०७ दिवसांकरीता बालरोगतज्ञांची सेवा महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथे संलग्न करण्यात आलेली आहे. तसेच, नागपूर परिमंडळांतर्गत असलेल्या विविध आरोग्य संस्थेतील नियमित स्वरुपात कार्यरत असलेल्या विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उसनवारी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथे संलग्न करण्यात येतात.

महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथे कार्यरत वैद्यकीय अधिकारी, निम-वैद्यकीय कर्मचारी व इतर कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना नियमितपणे रुग्णसुविधा पुरविली जात आहे. महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथे आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या आरोग्य विषयक सोयी व सुविधा उपलब्ध आहेत. सदर रुग्णालयात नियमितपणे बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, प्रसुती, सिजेरियन शस्त्रक्रिया, नवजात अतिदक्षता सेवा, बालरोगसेवा तसेच आपत्कालीन सेवा सातत्याने सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी (एस-२३) या संवर्गातील ४०७ पदांची जाहिरात प्रसिध्द झाली आहे. तसेच, वैद्यकीय अधिकारी, गट-अ ( एस-२० ) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने एमबीबीएस तसेच विशेषज्ञ मधील १४४० पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

महिला व बाल रुग्णालय, अहेरी येथील कार्यरत वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ तसेच आयपीएचएस अंतर्गत पुरविण्यात आलेल्या विशेषज्ञ सेवा यांचेव्दारे सदरील रुग्णालयामध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना विविध आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडुन रुग्णांना काळजीपुर्वक रुग्णसेवा प्रदान करण्यांत येतात. तसेच, रुग्णांस आवश्यक चाचण्या, औषधोपचार प्रदान करण्यात येत असून कोणत्याची रुग्णांची गैरसोय होत नाही.

******************************